(१)

**तातडीचे**

**क्रमांक : पोमसं/१६/३६९९/कवृंप-४८ वी सभा/४८/२०१६,** **मुंबई, दि. ३०/०६/२०१७.**

**विषय :- राज्य स्तरावरील पोलीस कर्मचारी वृंद परिषद - ४८ वी सभा.**

*******

राज्य स्तरावरील पोलीस कर्मचारी वृंद परिषदेची-४८ वी सभा शुक्रवार, दि.७/४/२०१७ रोजी दुपारी ११:०० वाजता महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई येथे घेण्यात आली. सदर सभेमध्ये वेळे अभावी चर्चा न झालेले मुद्दे, राज्य स्तरावरील पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या-४९ व्या सभेमध्ये चर्चेसाठी घेण्यात येणार आहेत. ४८ व्या सभेचा कार्यवृत्तांत माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी यासोबत पाठविण्यात येत आहे.

२. तरी घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, सदर कार्यवृत्तांत सर्व पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यासाठी मुख्यालयाच्या व पोलीस ठाण्यांच्या सूचना फलकांवर तो लावण्यात यावा. त्याचबरोबर, ह्या सभेमध्ये घेण्यात आलेले निर्णय घटकांच्या पोलीस राजपत्रांमध्ये प्रसिध्द करावेत. तसेच, ह्या कार्यवृत्तांताच्या प्रती त्यांच्या आस्थापनेवरील सदस्यांना देवून, त्याबाबत त्यांचे काही म्हणणे **(say / opinions)** असल्यास, ते एक महिन्याच्या आंत या कार्यालयास कळविण्याविषयी व या मुदतीत त्यांचे म्हणणे या कार्यालयाला प्राप्त झाले नाही, तर सदर कार्यवृत्तांत त्यांना मान्य असल्याचे गृहित धरले जाईल, असेही कृपया त्यांना सूचित करावे.

**(अनुप कुमार सिंह)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

**प्रति,**

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती / रा.रा.पो.बल / लोहमार्ग / दहशतवाद विरोधी पथक / प्रशिक्षण व खास पथकें / वाहतूक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, फोर्स -१, / महिला अत्याचार प्रतिबंधक व सायबर गुन्हे / ना.ह.सं., महाराष्ट्र राज्य, मुंबई.

# मागील ४७ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्यांवर माननीय अध्यक्षांनी आढावा घेऊन दिलेल्या सूचना

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मु- | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **४६ वी. क.वृ.प. आयत्यावेळी उपस्थित मुद्दा क्रमांक ५ :- मपोशि/३ ३ २, मंगला बालाजी आसूटकर, चंद्रपूर**<br><br>**<u>कार्यासन क्रमांक५</u>** | पोलीस उपनिरीक्षकांच्या परिक्षेबाबत:- यामध्ये गुणवत्तेनुसार व ज्येष्ठतेनुसार अशा दोन प्रवाहांचा अंतर्भाव होतो. शासनाच्या प्रचलित निर्णयानुसार / पध्दतीनुसार ज्येष्ठतेनुसार पद भरती घेण्यात येते. परंतु गुणवत्तेनुसार ज्यावेळी ज्येष्ठता असेल त्यावेळी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना सुध्दा संधी दिली गेली पाहिजे व निवृत्तीपूर्व पोलीस उप निरीक्षकपदी सेवा मिळाली पाहिजे असा विचार करण्यात यावा. | या संदर्भात सध्या प्रत्येक उमेदवार मॅटमध्ये जात आहे. परिक्षेचे नियम वेगवेगळे असतात. ते नियम तपासून पुढील निर्णय घेणे उचित होईल. जे उमेदवार परीक्षा उत्तीर्ण होतात. त्यांना नियमाप्रमाणे व ज्येष्ठतेनुसार पात्र ठरवावे लागेल. | प्रस्तुत प्रकरणी उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत सर्व घटक प्रमुखांना पाठवावी. | सदर प्रकरणी दि.२८/१२/२०१६ रोजी निकाल लागला असून उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत सर्व घटक प्रमुखांना पाठविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. | प्रचलित नियमानुसार १८८४ पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस उप निरीक्षक पदी पदोन्नती देण्यात आली आहे. उर्वरित २६४ रिक्त पदे १५ दिवसात भरण्यात येणार आहेत. सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यास मा. उच्च न्यायालयाची मान्यता आहे. **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| २ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**मुद्दा क्र. १३**<br>श्री. सादिक अकबर पठाण, पोलीस उप निरीक्षक, मोटार परिवहन विभाग, नागपाडा, मुंबई.<br>**कार्यासन क्रमांक ३-अ** | वाहनांची संख्या वाढल्याने जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस उप निरीक्षक पेक्षा पोलीस निरीक्षकांची पदे भरण्याबाबत. | पोलीस निरीक्षकांची पदे भरण्याबाबत विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, पुणे यांना कळविण्यात यावे. | **कार्यासन क्रमांक ३-अ :-** पोलीस निरीक्षक (मोप) यांची पदे दि.२९/०९/२०१६ व दि.१६/११/२०१६ च्या आदेशान्वये पदोन्नतीने भरण्यात आलेली आहेत. | पोलीस निरीक्षक (मोप) यांची पदे दि.२९/९/२०१६ व दि.१६/११/२०१६ च्या आदेशान्वये पदोन्नतीने भरण्यात आली आहेत. वि.पो.म.नि., मोटार परिवहन विभाग, म.राज्य, पुणे यांचेकडून पोलीस उप निरीक्षक पदे भरण्याबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.<br>**चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| ३ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**मुद्दा क्र. ३**<br><br>श्री.के.एम.सनांसे, पोहवा/२०२७, औरंगाबाद शहर<br><br>**का. क्र. ५.** | पोलीस शिपाई, पोलीस नाईक, पोलीस हवालदार, सहायक पोलीस उपनिरीक्षक या प्रमाणे पदोन्नती दिली जाते, ती वाढवून पोलीस उपनिरीक्षक पदापर्यंत देण्यात यावी. | घटकांत रिक्त असलेल्या पदांचा व सेवानिवृत्तीने रिक्त होणाऱ्या पदांची पदनिहाय यादी प्रत्येक महिन्यांत तयार करुन सर्व घटक प्रमुखांनी पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांची रिक्त असलेली पदे पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही वेळीच करावी. | दिनांक १७/१०/२०१५ च्या बिनतारी संदेशांन्वये पोहवा / सपोउनि ते पोउनि पदासाठी सेवाज्येष्ठतेनुसार २ महिन्यांकरिता तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मु- | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| ४ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**<u>मुद्दा क्र. १५</u>**<br><br>श्री.शिवदत्त गणपत मालंडकर,<br>सहायक गुप्तवार्ता अधिकारी,<br>राज्य गुप्तवार्ता विभाग,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई.<br><br>**<u>का. क्र. ३०/ ०६.</u>** | पोलीस नाईक हे पद पोलीस शिपायास अंदाजे २०/२१ वर्षानंतर पदोन्नतीवर मिळते. त्यानंतर पोलीस शिपाई २५/२६ वर्ष होवूनही पोलीस हवालदाराची पदोन्नती मिळत नाही. त्यामुळे पोलीस नाईक हे पद रद्द करुन सरळ पोलीस हवालदार, त्यानंतर सहायक पोलीस उपनिरीक्षक व निवृत्तीच्यावेळी पोलीस शिपायांना पोलीस उपनिरीक्षक हे पद सेवाज्येष्ठतेने मिळाल्यास सर्वांना सोयीस्कर होईल. कर्नाटक, पंजाब व राजस्थान या राज्यांमधील मा.पोलीस महासंचालकांनी तेथील शासनास अशा प्रकारचा प्रस्ताव पाठवून तेथील पोलीस कर्मचाऱ्यांना उपरोक्त प्रकारची पदोन्नती देत असल्याचे समजून येत आहे. तरी वरिष्ठांमार्फत शासनास असा प्रस्ताव सूचित करण्यास विनंती आहे. त्यामुळे पोलीस खात्यात व्यावसायीकरित्या काम करण्याची मानसिकता वाढेल. त्याचे चांगले परिणामही वरिष्ठ व शासनाला पहायला मिळतील. | प्रस्तुत प्रकरणी ग्रेड वेतन वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासन विचाराधीन असून, पाठपुरावा करण्याबाबत अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत. | **<u>कार्यासन क्रमांक ३०</u>:-** पुर्वी पोलीस शिपाई या पदांवरुन पोलीस हवालदार या पदावर पदोन्नती मिळण्यास सर्वसाधारणपणे १५ ते १८ वर्षाचा सेवाकाल व्यतीत होत असे. कर्मचाऱ्यांना लवकर पदोन्नती मिळावी यादृष्टीने शासनाने सन १९९३ पासून पोलीस शिपाई व पोलीस हवालदार या पदांमध्ये पोलीस नाईक या पदाची निर्मिती केली. आता पोलीस शिपाई या पदावरुन पोलीस नाईक हे पदोन्नती टप्प्यातील दुसरे पद आहे. परंतू सहाव्या वेतन आयोगात पोलीस हवालदार व पोलीस नाईक या पदांची वेतनश्रेणी व ग्रेड वेतन एकच केल्याने पोलीस नाईक या पदावरुन पोलीस हवालदार या पदावर पदोन्नती मिळाल्यास वेतनश्रेणी एकच असल्याने वेतननिश्चिती होत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना त्या ठिकाणी कोणताही आर्थिक फायदा होत नाही.<br>पोलीस नाईक व पोलीस हवालदार या पदासाठी वेगवेगळे ग्रेड वेतन मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधिन आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी लवकर प्राप्त होऊन त्यांना आर्थिक फायदा देखील होणार आहे. त्यामुळे पोलीस नाईक हे पद रद्द करणे योग्य नाही. **तरी सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | पोलीस नाईक व पोलीस हवालदार या पदासाठी वेगवेगळे ग्रेड वेतन मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधिन आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी लवकर प्राप्त होऊन त्यांना आर्थिक फायदा देखील होणार असल्याने, पोलीस नाईक हे पद रद्द करणे योग्य नाही. त्यामुळे<br>**चर्चेअंती**<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| ५ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**मुद्दा क्र. ८**<br>श्री. एस्. आय. अली, पोलीस निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे<br>**कार्यासन क्रमांक ६** | भारत राखीव बटालियन -२, येथील चालकाचे पद भरलेले नाही. | प्रस्तुत प्रकरणी शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल. | **कार्यासन क्र. ६ :-** यांनी त्यांचे दि.१२/८/२०१६ अन्वये सदर मुद्याच्या अनुषंगाने कार्यासन क्र.२६-ब यांचेकडून कार्यवाही चालू असल्याने कार्यासन क्र.६ वर पुर्तता अहवाल निरंक असल्याबाबत कळविले आहे.<br>**कार्यासन क्र. २६-ब :-** विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, पुणे यांनी एकत्रित माहिती तयार करुन महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील मोटार परिवहन विभागात स्वतंत्र वाहन चालक संवर्ग निमार्ण करुन त्यासाठी ६६८० पदे मंजूर करण्याबाबत दि. १८/७/१६ अन्वये प्रस्ताव या कार्यालयास सादर केला आहे. सदरचा प्रस्ताव या कार्यालयाचे दि. १७/१२/१६ अन्वये शासनास सादर करण्यात आला आहे.<br>विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, पुणे यांनी प्रस्ताव सादर करतेवेळी सर्व घटकांकडून पदे मंजूरीबाबत माहिती मागविण्यात आली होती. समादेश, भारत राखीव, बटालीयन - २, गोंदिया यांनी त्यांच्या आस्थापनेवर पदे मंजूरीकरिता अद्यापपर्यंत प्रस्ताव सादर केलेला नाही. त्यामुळे भारत राखीव बटालीयन-२, गोंदिया करिता चालक पोलीस शिपाई यांची पदे निर्माण करण्याकरिता प्रस्तावित करण्यात आले नाही. तसेच तेथे चालक पोलीस शिपाई पदे मंजूर नाहीत. | भारत राखीव, बटालीयन साठी चालक पोलीस शिपाईची पदे मंजूर नाहीत. भारत राखीव, बटालीयनमध्ये मंजूर नसलेली पदे भरण्याचा प्रश्नच उद्‌भवत नसल्याने, **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| ६ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**<u>मुद्दा क्र. १०</u>**<br>श्री. एस्. आय. अली , पोलीस निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे<br><br>**कार्यासन क्रमांक ६** | राज्य राखीव पोलीस बलाची कंपनी विशिष्ठ ठिकाणी तैनात असतांना, कंपनीकरिता उपलब्ण असलेल्या वाहनाचा चालक रजेवर असल्यास, त्यादरम्यान कायदा व सुव्यवस्थचा प्रश्न उपस्थित झाल्यास, त्वरित चालक उपलब्ध होणे आवश्यक असल्याने, रजेवर असलेल्या वाहन चालकास उपस्थित राहवे लागते. याकरिता या रजेच्या कालावधीची रजा पुढच्या साप्ताहिक सुट्टीस जोडुन देण्यात यावी. | प्रस्तुत प्रकरणी अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य यांना सूचना देण्याबाबत, अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत. | "राज्य राखीव पोलीस बलाची कंपनी विशिष्ट ठिकाणी तैनात असताना, कंपनीकरिता उपलब्ध असलेल्या वाहनाचा चालक रजेवर असल्यास, त्या दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित झाल्यास, त्वरीत चालक उपलब्ध होण आवश्यक असल्याने, रजेवर असलेल्या वाहन चालकास उपस्थित राहवे लागते. या करिता या रजेच्या कालावधीची रजा पुढच्या साप्ताहिक सुट्टीस जोडून देण्यात यावी. असे कार्यासन क्र. ६ यांनी अपर पोलीस महासंचालक, रा.रा. पो. बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना दि.१६/७/२०१६ च्या ज्ञापान्वये कळविले आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | सदरच्या मुद्यावर घटक प्रमुखांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घेणे अपेक्षित आहे. **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद नसलेले अधिकारी /कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश | संबधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| ७ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**<u>मुद्दा क्र. ३</u>**<br>श्री.मारुती ज्ञानदेव मगदूम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, परि.४, विशा.१, गृन्हे अन्वेषण विभाग, मुंबई.<br>**कार्यासन क्र.९** | पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह प्रदान करण्यासाठी निवड करतांना एकुण बक्षीसांची संख्या, गुणवत्ता, सेवाकाल, सातत्यपुर्ण सचोटी इत्यादी बाबींचा व्यवहार दृष्टीकोनातून सारासार विचार व्हावा. १५ वर्षापूर्वीच्या कालावधीतील शिक्षा विचारात घेवू नयेत. | प्रस्तुत प्रकरणी विचार करण्यात येईल, असे अध्यक्षांनी सूचित केले आहे. | पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह हे एकूण १० प्रवर्गांतर्गत मंजूर करण्यात येते. त्यामध्ये प्रवर्ग ७ व ८ साठी उपरोक्त नमूद बाबींचा काटेकोरपणे विचार करण्यात येतो. तसेच, पात्र अधिकारी / कर्मचारी यांची अंतिम निवड करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेली निवड समिती प्रवर्गनिहाय छाननी करुनच निर्णय घेते.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | मुंबई व ठाणे बाहेर बदली सेवा केली आहे. अशा नागपूर, औरंगाबाद येथे सेवा केलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्राध्यान्य देण्यात येऊन त्यानंतर पश्चिम महाराष्ट्रातील कार्यरत पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचा विचार करण्यात यावा. असे मा. अध्यक्षांनी मत व्यक्त केले आहे.<br>**चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| ८ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**मुद्दा क्र. ११**<br>श्री. एस्. आय. अली, पोलीस निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे<br><br>**कार्यासन क्रमांक १८** | गणवेशामधील एकसूत्रीपणा येण्यासाठी एकाच ठिकाणी गणवेषाचा कपडा उपलब्ध करुन देण्यात यावा. | प्रस्तुत प्रकरणी सबसिडीअरी कॅन्टीन, मुंबईद्वारे ऑनलाईन खरेदीची नोंदणी पध्दत उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करावी. | **कार्यासन क्रमांक १८ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.युएनएफ-१०१२/प्र.क्र.१९५/२०१२/पोल-४, दि.२६/८/२०१४ अन्वये गणवेष साहित्याऐवजी नित्याच्या स्वरुपात लागणाऱ्या २५ गणवेष बाबींसाठी प्रतिवर्षी अपेक्षित किमान रु.५,१६७/- इतका गणवेष भत्ता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार वित्तीय वर्ष सन २०१४-१५ पासून राज्यातील सर्व पोलीस कर्माचाऱ्यांना गणवेष भत्ता देण्यात येत आहे. सदर गणवेष भत्ता अनुदानामध्ये गणवेषाच्या खाकी कापडाचा समावेश असून, सदरचे कापड पोलीस कर्मचारी स्वत: खरेदी करीत असतात.<br>**कार्यासन क्रमांक २८-अ :-** शासन निर्णय दि.२६/०८/२०१४ अन्वये शासन गणवेश साहित्याऐवजी नित्याच्या स्वरुपात लागणाऱ्या २५ गणवेष बाबींसाठी प्रतिवर्षी अपेक्षित किमान रु.५,१६७/- इतका गणवेश भत्ता सन २०१४-१५ पासून राज्यातील सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना देण्यात येत आहे. त्या गणवेश भत्त्यातून पोलीस अधिकारी / कर्मचारी हे त्यांच्या पसंतीनुसार वेगवेगळया ठिकाणाहून वेगवेगळया उत्पादकांनी तयार केलेले कापड खरेदी करुन ते टेलरकडून गणवेश शिवून घेत असल्यामुळे, सर्व पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या गणवेशामध्ये | गणवेषासाठी चांगल्या दर्जाचे कापड पुरविणाऱ्या कंपन्यांकडून कापडाचा नमुना घेऊन, योग्य कापडाची निवड करण्याकरिता ७ ते ८ जणांची समिती स्थापन करुन समितीवर पोलीस कर्मचारी वृंद परिषेदतील तीन सदस्यांची प्रतिनिधी म्हणून नेमणूक करुन २/३ कंपनीमधून चांगल्या दर्जाचे, व योग्य किंमतीचे कापड निवडून सबसिडीअरी पोलीस कॅन्टीनमध्ये उपलब्ध करुन देण्यात यावे. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांनी त्यांच्या नियंत्रणाखाली कापड खरेदी प्रक्रिया पुर्ण करावी. तसेच, पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांनी स्वयंशिस्तीने सबसिडीअरी पोलीस कॅन्टीनमधूनच गणवेष कापडाची खरेदी करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| | | | | एकसारखेपणा (Uniformity) दिसून येत नाही. बऱ्याच पोलीस कर्मचाऱ्यांनी हलक्या प्रतीचे कापड खरेदी करुन गणवेश शिवलेल असल्यामुळे अल्प कालावधीतच तो बेरंग दिसू लागतो. त्यामुळे सर्व पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या गणवेशामध्ये एकसारखेपणा येण्यासाठी त्यांच्या गणवेशाचे कापड एकाच उत्पादकांकडून घेतल्यास, त्याची गुणवत्ता (Quality) एकसारखी दिसून येण्यासाठी या कार्यालयाचे दि.२१/०९/२०१६ चे परिपत्रकान्वये गणवेशा संबंधीतील वस्तू प्रत्येक सबसिडीअरी कॅन्टींनमध्ये विक्रीस उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकांशी संलग्न मास्टर कॅन्टींनमधील त्या वस्तुंचा / कापडाचा दर्जा पाहून त्याच्या किंमतीबाबत चौकशी करावी व त्याची माहिती घटकातील कार्यरत पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना देवून त्यांच्या कडून मागणी झाल्यास त्याप्रमाणे गणवेशाचे कापड व इतर संबंधीत साहित्य सबसिडीअरी कॅन्टींनमधून उपलब्ध करुन देण्याबाबत सर्व घटाकांना निर्देश देण्यात आलेले आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नाव/घटकांचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| ९ | **४५ वी. क.वृ.प. आयत्या वेळी उपस्थित मुद्दा क्र. १**<br>श्री. विजयकुमार वि. पल्लेवार, पोलीस निरीक्षक, दहशतवाद विरोधी पथक, मुंबई<br>**का.क्र.१९** | पोलीस उप अधीक्षक व त्यावरील दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांना टेलिफोनची सुविधा आहे. पोलीस निरीक्षकांनादेखील टेलिफोन-इंटरनेटची सोय/तरतूद उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. | सदर मुद्दा संबंधीत कार्यासनाने लवकरात-लवकर निकाली काढण्याबाबतची कार्यवाही करावी. | प्रस्तुत प्रकरणी पोलीस निरीक्षकांना देखील टेलिफोन सुविधेची प्रतिपूर्ती मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत मा.अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत. | शासन निर्णय, क्र.टीएलसी/०५४०/ प्र.क्र.९०/पोल-४, दि.५/६/२००८ व समक्रमांकित, दि.२०/६/२००८ चे शुध्दीपत्रक अन्वये राज्यातील सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी व त्यावरील दर्जाच्या एकूण १३८७ अधिका-यांना कार्यालय निहाय भ्रमणध्वनी (मोबाईल) Closed User Group सुविधेसह मंजुरी प्रदान केली आहे. सदर शासन निर्णयात मर्यादित वापर गटाचा (CUG) एक घटक तयार करून या घटकासाठी सेवा प्राप्त करून घेण्यासाठी ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी मर्यादित वापर गटामधील (CUG) व विशिष्ट सीरीजचे फोन नंबर असलेले कॉल नि:शुल्क असतील अशी एक अट नमूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही. पोलीस विभागामध्ये सन २००८ नंतर नवीन जिल्हे/विभाग तसेच, नवीन पदांची निर्मिती झ ाली आहे व काही पदांना श्रेणीवाढ देण्यात आली आहे तसेच, भविष्यात निर्माण होणा-या पदांकरिता ही योजना लागू होईल. त्यामुळे मर्यादीत वापर गटाचा (CUG) सुविधेकरिता पोलीस महासंचालक ते सहा पोलीस उपमहानिरीक्षक, पो. आयुक्त ते पो. उप आयुक्त/ जिल्हा पो. अधीक्षक ते पो. उप अधीक्षक / उप वि.पो. अधिकारी, जिल्हा पोलीस ठाण्यातील प्रभारी पोलीस अधिकारी असे एकूण १८३६ पदांकरिता ही योजना | मर्यादित वापर गट (Closed User Group) मध्ये समाविष्ठ असलेले अधिकाऱ्यांच्या बदल्या होतात, त्यामुळे सदर सुविधा सुरळीत चालू राहत नाही. त्यामुळे कार्यालयाचा पोलीस महासंचालक ते सहा पोलीस उपमहानिरीक्षक, पो. आयुक्त ते पो. उप आयुक्त/ जिल्हा पो. अधीक्षक ते पो. उप अधीक्षक / उप वि.पो. अधिकारी, जिल्हा पोलीस ठाण्यातील प्रभारी पोलीस अधिकारी यांना CUG योजना लागू करण्याबाबतचा या कार्यालयाचा शासनास पाठविण्यात आलेला प्रस्ताव काढून घेऊन पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी आणि पोलीस ठाण्यांमध्ये नियुक्तीस असलेले पोलीस निरीक्षक यांना दुरध्वनी भत्ता देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करावा. असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नाव/घटकांचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | दि.१/४/२०१५ पासून लागू करून मंजुरी देण्याबाबत या कार्यालयाचे दि.३१/८/२०१५ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे दि.१८/२/२०१६, १६/७/२०१६, आणि दि.१६/०८/२०१६ रोजी अ.शा.पत्र स्मरणपत्रे पाठविण्यात आली आहेत. परंतू सदर प्रस्तावास अद्याप शासन मंजूरी प्राप्त झालेली नाही.<br>सदर प्रस्तावामध्ये जिल्हा पोलीस ठाण्यातील प्रभारी पोलीस अधिकाऱ्यांना (पोलीस निरीक्षक /सहायक पोलीस निरीक्षक/ पोलीस उप निरीक्षक) यांना मर्यादीत वापर गटाच्या (CUG) सुविधेचा लाभ मिळावा असे प्रस्तावित करण्यात आले आहे. त्यामुळे प्रथमत: या प्रस्तावास शासन मंजूरी प्राप्त झाल्यानंतर मर्यादीत वापर गटाच्या (CUG) सुविधेचा लाभ सर्व पोलीस निरीक्षकांना देखिल मिळावा असा प्रस्ताव शासनास पाठविणे उचित होईल.<br>या संदर्भात मोबाईल कंपन्यांशी चर्चा करून दराबाबतची माहिती घेणे. | |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मु- | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| १० | **४७ वी. क.वृ.प.**<br>**मुद्दा क्र. ९**<br>श्री. एस्. आय. अली, पोलीस निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे<br><br>**कार्यासन क्रमांक २१** | राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्या बंदोबस्तास तैनात असतांना बंदोबस्त दरम्यान स्थानिक पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना विभागाची माहिती असल्याने बंदोबस्तास अंतिम करतेवेळी राज्य राखीव पोलीस बलाच्या कंपन्यांची प्रथमत: रवानगी करावी, व स्थानिक विभागातील पोलीस अधिकाऱ्यांना हजर राहण्याबाबत कळविण्यात यावे. | प्रस्तुत प्रकरणी बंदोबस्त संपल्यानंतर स्थानिक पोलीस अधिकारी / कर्मचात्यांसोबतच राज्य राखीव पोलीस बलाच्या बंदोबस्तावरिल कंपन्यांना देखिल मोकळीक करण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात येईल. | बंदोबस्त संपल्यानंतर स्थानिक पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांसोबतच राज्य राखीव पोलीस बलाच्या बंदोबस्तावरील कंपन्यांना देखील मोकळीक करण्याबाबत या कार्यालयाचे क्र.पोमसं/२०-अ/३४-अ/ क.वृं.प.४७ वी सभा/७२/ २०१६, दि.१३/७/२०१६ च्या ज्ञापान्वये सर्व पोलीस घटकांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ११ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**मुद्दा क्र. ७**<br><br>श्री.एस.आय.अली, पोलीस निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे<br><br>**कार्यासन क्रमांक २३** | विविध गुन्ह्यात जमा करण्यात आलेली शस्त्रे, रिक्त पुंगळ्या व इतर शासकीय मुद्देमाल लवकरात लवकर परत मिळावा, | विविध गुन्ह्यात जमा करण्यात आलेली शस्त्रे, रिक्त पुंगळ्या व इतर शासकीय मुद्देमालबाबत न्यायालयीन खटला प्रलंबित असतांना, जप्त करण्यात आलेली शस्त्रे, रिक्त पुंगळ्या व इतर शासकीय मुद्देमाल परत प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधीत घटक प्रमुखांनी संबंधीत न्यायालयाकडे पत्रव्यवहार करण्यास सूचित केले. तसेच, अपर पोलीस महासंचालक (का.व सु.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सर्व घटक प्रमुखांकडून याबाबतचा आढावा घ्यावा, | वेगवेगळ्या गुन्ह्यांमध्ये पोलीसांकडून जप्त केलेला किंमती मुद्देमाल जेस सोने-चांदी, जड-जवाहीर, इलेक्ट्रॉनिक्स वस्तु इ. मा. न्यायालयाने आदेश घेऊन संबंधीत फिर्यादिस परत करणेबाबत या कार्यालयाचे क्र.पोमसं/२३/५४/मुद्देमाल /५०३/२०१६ दि.३१/५/२०१६ अन्वये राज्यातील सर्व पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षकांना सविस्तर सुचना देण्यात आल्या आहेत.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नाव/घटकांचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | **४६ वी. क.वृ.प.** **<u>मुद्दा क्रमांक-१७:-</u>** **पोलीस निरीक्षक मारुती ज्ञानदेव मगदूम बृहन्मुंबई** <br><br> **(<u>कार्यासन क्र. २६ब, २८-अ</u>)** | पोलीस हॉस्पिटल्स्मध्ये आरोग्याचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने सद्य:स्थितीत असलेल्या हॉस्पिटल्स, प्रयोगशाळामधील सुविधा, तसेच तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपलब्धता, तसेच इमारत इत्यादी संबधाने आढावा घेऊन मध्यवर्ती ठिकाणी / महत्वाच्या ठिकाणी असलेले हॉस्पिटलांचे नुतनीकरण तसेच तेथे संपूर्ण दिवसभर तज्ञ वैद्यकीय अधिकारी उपलब्ध राहतील, तसेच दर्जेदार औषधांचा सदैव पुरवठा राहील व गरजू पोलीस अधिकारी व अंमलदारांना तत्परतेने सदर सेवेचा सदैव उत्तम प्रकारे लाभ मिळत राहील यादृष्टिने काळजीपुर्वक पाठपुरवठा व्हावा. प्रत्येक जिल्ह्यांच्या ठिकाणी सुसज्ज पोलीस हॉस्पिटल्स्ची निर्मिती होणे जरुरीचे आहे. | पोलीस रुग्णालयांची सोय किती जिल्ह्यांमध्ये अद्याप नाही. तसेच पुणे, नागपूर, ठाणे यांच्याकडे किती पोलीस रुग्णालये उपलब्ध आहेत याबाबतचा आढावा घ्यावा. तसेच, ज्या ठिकाणी अशा सोयी नाहीत, त्याठिकाणी त्यांची आवश्यकता आहे काय, हे तपासून पाहून तशा प्रस्तावावर विचार करण्यात येईल असे अध्यक्षांनी सांगितले. | विविध घटकांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करावेत. तसेच मानधन तत्वावरील डॉक्टर, नर्सेस व वॉर्डबॉय यांची नेमणूक करण्याविषयी सर्व घटक प्रमुखांकडे खात्री करावी, असे अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत. | **<u>कार्यासन क्र. २६-ब</u> :-** (१) पोलीस अधीक्षक, जालना यांचे आस्थापनेवर रुग्णालय निर्मीतीबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाचे क्र.पोमसं/२६-ब/रुग्णालय/जालना/०३/२०१६, दि.२४/२/२०१६ च्या पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला आहे. दि. ६/५/२०१६, २४/६/२०१६, ३०/९/२०१६, आणि २४/११/२०१६ रोजी स्मरणपत्रे पाठविण्यात आली आहेत. <br> **(२)** पोलीस अधीक्षक, वाशिम व अकोला यांना शासन निर्णय दि.२/६/२०१६ अन्वये नविन पदनिर्मीती बंद केली असल्याने शासनास प्रस्ताव सादर करणे शक्य नसल्याने अनुक्रमे क्र.पोमसं/ २६-ब/वाशिम/रुग्णालय/०४/२०१६, दि.२६/२/२०१ व क्र.पोमसं/२६-ब/वाशिम/ रुग्णालय/०५/२०१६, दि.१४/०३/२०१६ च्या ज्ञापान्वये कळविण्यात आले आहे. <br> **(३)** पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांचेकडून या कार्यालयाचे पोमसं/२६-ब/कोल्हापूर/रुग्णालय/०६ /२०१६, दि.०२/०२/२०१६ च्या ज्ञापान्वये सुधारित प्रस्ताव मागविण्यात आला होता. दि.२/१२/२०१६ च्या पत्रान्वये रुग्णालयाची आवश्यकता नसल्याचे पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांनी कळविले आहे. <br> **<u>कार्यासन क्र. २८-अ :-</u>** <u>पोलीस</u> रुग्णालयाची निर्मीती व पदे भरण्याबाबत कार्यासन क्र.२६-ब यांचेकडे सदर विषय हाताळण्यात येत असून, त्याबाबतचे प्रस्ताव सदरच्या कार्यासनास प्राप्त होत असल्याने, सदरच्या कार्यासनाकडून कार्यवाही होणे आवश्यक आहे. तसेच, या | पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांनी सरकारी रुग्णालयांचा वापर करावा. नवीन रुग्णालयाच्या निर्मीतीसाठी खर्च करण्यापेक्षा अस्तित्वात असलेल्या शासकीय रुग्णालयाचा दर्जा वाढविण्यासाठी खर्च करणे उचित होईल. त्यामुळे नवीन हॉस्पीटलची आवश्यकता नाही. असे मा. अध्यक्षांनी मत व्यक्त करुन **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नाव/घटकांचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/२८-अ/४९३७/ क.वृं.प.४७वी सभा/२२७/२०१५, दि.७/४/२०१६ व स्मरणपत्र दि.२४/६/२०१६ अन्वये जिल्ह्यात/ घटकात पोलीस रुग्णालयाची आवश्यकता असल्याने, तेथील वैद्यकीय अधिकारी, औषधनिर्माता (फार्मासिस्ट) नर्सेस व वॉर्डबॉय यांची उपलब्धता, प्रयोगशाळेतील सुविधा याबाबतची माहिती त्याचप्रमाणे, रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत आवश्यक ती कार्यवाहीही सत्वर करण्याबाबत परिपत्रक निर्गमीत केले आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नाव/घटकांचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | **४५ वी. क.वृ.प.**<br>**मुद्दा क्र. २०**<br>श्री.पी.पी. डोईजड, असई/४४५, रा.रा.पो.बल, गट क्र. ५, दौंड<br>**का.क्र. २७(ब)** | राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ५ व ७, तसेच इतर गटातील बॅचलर लाईन सन १९६७-६८ दरम्यानच्या कालावधीत बांधण्यात आलेल्या असून सदर इमारती पाडून त्याजागी नव्याने इमारती बांधण्यात याव्यात. | रा.रा.पो.बल गट क्र.५ व ७ येथे टप्प्याटप्प्याने इमारती बांधण्याचे काम सुरु आहे. रा.रा.पो.बल गट क्र.४ नागपूर येथे अडचण येत असल्याचे मा. अध्यक्षांनी सांगितले. | नव्याने इमारती बांधण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत मा.अध्यक्षांनी सूचित केले आहे. | समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र.५ व ७, दौंड पोलीस गृहनिर्माण संस्था यांचेकडून टप्पाटप्याने इमारती बांधकाम सुरु आहे.<br>समादेशक, रा.रा. पो.बल, गट क्र. ४, नागपूर यांचे आस्थापनेवर ५२८ निवासस्थाने आवश्यक असल्याबाबतचा प्रस्ताव अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, यांच्या दिनांक २९/९/२०१५ च्या पत्रान्वये या कार्यालयास प्राप्त झाला असून सदरचा प्रस्ताव या कार्यालयाचे क्र. पोमसं/२७-ब/२८-ब/संकुल बांध.क्र.४ नागपूर/ २७८/२०१५, दि.२०/१०/२०१५ अन्वये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, गृहनिमार्ण व कल्याण महामंडळाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीकरिता पाठविण्यात आला आहे. पोलीस गृहनिर्माण यांचेकडे सदर प्रस्ताव नियोजन स्तरावर असून अभियंता यांचेकडून जागेचे सर्वेक्षण करण्यात आले आहे.<br>राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.४, नागपूर गटाच्या आस्थापनेवरील १) परिसरातील जागेवर विपोमनि, नागपूर यांचे कार्यालय व बंगला तसेच २) मेस हॉल, बहूउद्देशिय हॉल, स्विमींग पुल, मैदानावर स्टेडीयम, वाचनालय बांधकामाचा प्रस्ताव या कार्यालयाचे क्र. पोमसं/ २७-बी/२८-बी/रारापोबल गट ४-गट परिसरातील बांधकाम/१/२०१७, दि.२५/०१/२०१७ अन्वये व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात आला आहे. | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नाव/घटकांचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| १४ | **४६ वी. क.वृ.प.** **<u>मुद्दा क्रमांक-१६</u>:-** **पोलीस निरीक्षक मारुती ज्ञानदेव मगदूम बृहन्मुंबई** **(<u>कार्यासन क्र. २७ब</u>)** | मुंबईतील दाटीवाटीचा परिसर विचारात घेता, निवासव्यवस्थेचे विकेंद्रीकरण, तसेच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांची सेवानिवृत्तीच्या वेळी आरोग्याच्या दृष्टिने निमार्ण झालेली विकलांगता, असहाय्यता, नातेवाईकांचे दुरावलेले संबध इत्यादि बाबींच्या पार्श्वभूमीवर सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व अंमलदारांना निवृत्तीनंतर लगतच्या कालावधीत विनाविलंब सहजसुलभ निवासव्यवस्था त्यांच्या मुळ जिल्ह्यांच्या ठिकाणी उपलब्ध व्हावी यादृष्टिने प्रत्येक विभागीय विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक यांच्या पुढाकाराने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी पोलीस वसाहती, पोलीस गृहनिर्माण संस्था उभारण्याच्या दृष्टिने महसूल व वन विभाग, नगर विकास, ग्राम विकास, अपारंपारिक उर्जा विभाग, | सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांची व्यवस्था होण्याच्या दृष्टीने आदेश झालेले असून, प्रत्येक विभागप्रमुखांकडून असा प्रकल्प राबविण्या बाबतचे काम हाती घेण्यात येत आहेत. पोलीस अधिकाऱ्यांच्या सामुहिक सहभागातून को-ऑप. संस्था निर्माण करुन वसाहती उभ्या करण्यासाठी जमीन उपलब्ध करुन घेण्याबाबत पुढाकार घ्यावा, असेही सांगण्यात आले आहे. यासाठी सार्वजनिक स्तरावर प्रयत्न केले गेले पाहिजेत. कोल्हापूर येथे अशी संस्था निर्माण केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी मा. मुख्यमंत्री | पोलीस कर्मचाऱ्यांसाठी को. ऑप. संस्था निर्माण करण्या साठी मोठ्या प्रमाणात खाजगी जागा मालकी तत्वावर प्राप्त करुन घेण्या बाबतची कार्यवाही करून, को. ऑप. संस्था निर्माण करण्या बाबत सर्व घटक प्रमुखांना सूचित करण्यात यावे. | कार्यासन क्र.२७-ब यांनी त्यांचे दि.१७/३/२०१६ च्या ज्ञापान्वये सर्व घटक प्रमुखांना मुद्दा क्र. १६ प्रमाणे कार्यवाही करुन अहवाल तात्काळ सादर करण्याबाबत कळविले आहे. **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांचे हक्काच्या घराकरिता घर बांधणी अग्रीम / बँकेमार्फत गृह कर्जाचा उपयोग करण्याच्या सूचना दिल्या. **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नाव/घटकांचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | शासकीय गृह बांधणी प्राधिकरणे इत्यांदिशी सुसंवाद प्रस्थापित करुन अद्यावत वसाहती उभारण्याच्या दृष्टिने विशेष मोहिमा आयोजित होणे नितांत जरुरीचे आहे.<br>अनेक सेवाभावी पोलीस अधिकाऱ्यांच्या उत्स्फुर्त सामुहिक सहभागातुन मुंबई पोलीस दलातील पोलीस कर्मचाऱ्यांकरीता "बृहन्मुंबई पोलीस सहाकारी गृहनिमार्ण प्रकल्प, पनवेल"या महत्त्वाकांक्षी मेगाहाऊसिंग प्रोजेक्टची उभारणी चालू आहे. सदर प्रकल्पास सर्व संबधीतांचे उत्तम पाठबळ लाभल्यास तो अल्पावधीत पुर्णत्वास येईल. सदरचा प्रकल्प मुंबई, महाराष्ट्र तसेच देशभरातील पोलीसांसाठी प्रेरणादायी ठरेल. | महोदयांना अर्ध शासकीय पत्राद्वारे विनंती करण्यात येईल. | | | |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मु- | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| १५ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**<u>मुद्दा क्र. ११</u>**<br>श्री. मारुती ज्ञानदेव मगदूम, पोलीस निरीक्षक, परि.४, विशेष शाखा-१, गु.अ.वि, बृहन्मुंबई.<br><br>**<u>का. क्र. २७-ब.</u>** | महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळ सन १९८८ साली आंबिवली, अंधेरी (पश्चिम) येथील विस्तीर्ण भूखंड महामंडळाचे नांवे हस्तांतरित करुन दिलेला होता. तथापि, महामंडळाची निष्क्रीयता, तसेच उदासिनतेमुळे सदरचा भूखंडही इतरांनी हडप करुन त्यावर इमारती उभारल्या आहेत. तसेच, अतिक्रमणही केलेले आहे.<br>पोलीस कर्मचाऱ्यांच्या घरांची दुरावस्था, डागडुजी न केलेल्या मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारती, शासकीय कार्यालये, अनेक गैरसोयी तसेच, मुलभूत सुविधांचा अभाव अशी विदारक परिस्थीती असतांनाही त्याकडे दुर्लक्ष करुन महामंडळाने आपल्या कार्यालयाचा पंचतारांकित कायापालट करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च केलेला आहे. सदरची बाब अविवेकी, तसेच आक्षेपार्ह आहे.<br>महामंडळाच्या स्थापनेपासून (सन १९७४) ते आतापर्यंत (सन २०१५) म्हणजेच ४१ वर्षाच्या प्रदिर्घ कालावधीत महामंडळाने पोलीसांच्या निवासस्थानांची समस्या, तसेच सोयी-सुविधा उपलब्ध करणे, इमारतींची डागडुजी, रंगरंगोटी इत्यादी बाबी संबंधाने केलेली कार्यवाही विचारात घेतली असता निराशाजनक परिस्थिती आहे.<br>वर नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळाची पोलीस यंत्रणेच्या कल्याणा संबंधाने उदासिनता, तसेच, निष्क्रियता तसेच आक्षेपार्ह व अविवेकी कार्यपध्दतीमुळे महामंडळाची स्थापना होवून, | पोलीसांच्या जागेवरील अतिक्रमणे दूर करुन घेण्याबाबत तातडीने कार्यवाही करुन, त्याबाबतचा पूर्तता अहवाल २ महिन्याच्या मुदतीत या कार्यालयास पाठविण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात यावे. | **<u>कार्यासन क्र. २७-ब</u>** :- यांनी त्यांचे ज्ञापन दि.१७/३/२०१६, व स्मरणपत्र दि.१४/७/२०१६ अन्वये मुद्दा क्र. ११ मध्ये पोलीसांच्या जागेवरील अतिक्रमणे दूर करुन घेण्याबाबत तातडीने कार्यवाही करुन याबाबातचा अहवाल लवकरात लवकर पाठविण्याबाबत संबंधीत घटकांना कळविले आहे. त्यास अनुसरुन खालील घटक प्रमुखांनी पुढीलप्रमाणे माहिती कळविली आहे:-<br>**पोलीस अधीक्षक, धुळे** पिंपळनेर पोलीस ठाणेतील ५,७१४.२८ चौ.मी. जागेवर अतिक्रमण करण्यात आले आहे सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.<br>**प्राचार्य, पो.प्र.के., अकोला** पोलीस विभागाच्या ४२ आर. जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत एकुण ३६ लोकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.<br>**पोलीस अधीक्षक, नांदेड** पोलीस वसाहतीच्या २,४०० चौ.मी. जमिनीवर अतिक्रमण करुन पक्की घरे बांधलेल्या लोकांविरुध्द गुन्हा दाखल करुन न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले सदर केसचा निकाल दि. ०८/०४/२००८ रोजी लागला असून अतिक्रमणधारक निर्दोष सुटले आहेत. प्रस्तृत प्रकरणी अतिरिक्त सत्र न्यायालय कंधार येथे अतिक्रमण धारक २५ लोकांविरुध्द दिवाणी दावा दाखल केला असून तो न्यायप्रविष्ठ आहे.<br>**पोलीस आयुक्त, पुणे** पोलीस विभागाच्या जागेवरील अतिक्रमण काढुन टाकण्याचे प्रकरणी दिवाणी न्यायाधीश शिवाजीनगर, पुणे यांच्या न्यायालयात दावा दाखल केला असता सदर दाव्याचा निकाल पोलीस विभागच्या बाजूने लागलेला आहे. तसेच हडपसर पोलीस ठाणेसाठी ३०आर. जागा जिल्हाधिकारी | भूखंड संरक्षण करणे त्यावर अतिक्रमण होऊ न देणे ही जबाबदारी पोलीस गृहनिर्माण महामंडळाची नसून ती संबंधीत घटक प्रमुखांची जबाबदारी आहे.<br>**चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मु- | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रदिर्घ कालावधी लोटला जावूनही अत्यंत निराशाजनक परिस्थिती आहे. वरिल नमूद बाबींमुळे महामंडळाचे व दुरान्वयाने पोलीस यंत्रणेचे फार मोठे नुकसान झालेले आहे. तसेच, पोलीसांच्या निवासस्थानांच्या प्रश्नाने उग्र स्वरुप धारण केलेले आहे.<br>वरील नमूद बाबींची गांभीर्यपूर्वक दखल घेवून पोलीस दलातील सर्व स्तरावरील अधिकारी व अंमलदारांचे व्यापक हित विचारात घेवून सदर महामंडळाचे कामकाज सचोटीने होईल व त्यात सातत्य राहील, यादृष्टीने सदर महामंडळाकडून केलेल्या कामकाजाचा संबंधाने योग्य त्या स्तरावर दर महिन्याला आढावा घेवून, त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही / उपाययोजना होईल, यादृष्टीने शासनाकडे योग्य तो पाठपुरावा करणेविषयी विनंती आहे. | | कार्यालयाकडून पोलीस विभागाचे नावे झाली असून सदर जागे संदर्भात सौ. जनाबाई मोडक यांनी जिल्हाधिकारी व तहसिलदार यांचे विरुध्द याचिका दाखल केलेली असून सदर याचिका न्यायप्रविष्ठ आहे.<br>**पोलीस आयुक्त, अमरावती शहर** राजापेठ पोलीस ठाणे येथील ११७३ चौ.फु. जागेवर से.नि. स.पो.उ.नि.विष्णूपंत वर्धेकर यांनी अतिक्रमण केलेले आहे व त्याकरिता दावा दाखल केला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. फ्रेजरपुरा पो. ठाणे हद्दीमधील ९२९ चौ. मी. या पो.अ., ना.ह.सं, अमरावती यांना दिलेल्या जागेवर लोकांनी झोपडया बांधुन अतिक्रमण केलेले आहे. त्याबाबत पो.अ., ना.ह.सं, अमरावती यांना कळविण्यात आले आहे. टाकरखेडा संभु येथील पोलीस विभागाच्या जागेवर स्थानिक लोकांनी अतिक्रमण केले आहे. सदर अतिक्रमण दुर करण्याची कार्यवाही सुरु आहे.<br>**समादेशक, रा.रा.पो.बल, गट ३, जालना** गणेश मंदिर परिसर ७.२२ एकर जमिनीवर ७/१२ उताऱ्यावर गणेश मंदिर असे नाव असल्याने समादेशक यांचे नाव टाकण्यात येत आहे. सदर प्रकरण एम.डी.एम. जालना यांचेकडे प्रलंबित आहे. गोळीबार मैदान (बट रेंज) ३८ एकर १२ गुंठे जागेचे वादबाबत मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दि. ०८/०१/२०१६ रोजी एस.एल.पी. दाखल करण्यात आली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. दादेहयात कब्रस्तान ८ एकर ३ गुंठे जमिनीवर दादेहयात कब्रस्तान यांनी अतिक्रमण केलेले असून त्या बाबतचा वाद मा. वक्फ ट्रिब्यूनल, औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ आहे. | |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मु- | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| १६ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**मुद्दा क्र. १६**<br>बाळकृष्ण धनवान खांडेकर, सपोह/५९०, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ९, अमरावती<br>**कार्यासन क्रमांक २७-ब** | राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक ३, जालना येथील शासकीय इमारती, कार्यालये, शासकीय निवासस्थान व बॅचलर बॅरेक हे निजामकालीन असून, नवी इन्फ्रास्ट्रक्चरप्रमाणे बांधकाम व्हावे. | प्रस्तुत प्रकरणी व्यवस्थापकीय संचालक, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मार्यादित, मुंबई यांचेकडे तातडीने पाठपुरवा करावा, असे अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत. | **कार्यासन क्र. २७-ब :-** समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.३, जालना येथील ५५७ निवासस्थाने व प्रशासकीय इमारत बांधकामाबाबतचा प्रस्ताव व्यवस्थपाकीय संचालक, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्यादीत, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे निविदा स्तरावर आहे. | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| १७ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**मुद्दा क्र. १**<br>पोलीस अधीक्षक, नांदेड<br>**का. क्र. २७-ब.** | पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचे आत्तापर्यंत बांधकाम केलेली शासकीय निवासस्थाने हे जुन्या वेतनश्रेणीनुसार बांधण्यात आलेली आहेत. यापुढील नवीन बांधकाम होणारी शासकीय निवासस्थाने ही सुधारीत वेतनश्रेणीनुसार बांधकाम करण्यात यावीत. तसेच प्रत्येक वर्षी नवीन पोलीस भरती होत आहे. परंतु, त्यानुसार शासकीय निवासस्थान बांधली जात नाही. त्यामुळे पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना शासकीय निवासस्थाने मिळत नाहीत. सुधारीत मंजूर संख्याबळाप्रमाणे शासकीय निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात यावीत. | पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांना किती शासकीय निवासस्थानांची आवश्यकता आहे, याबाबतची माहिती सर्व घटक प्रमुखांकडून मागवून, त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा. | पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना किती शासकीय निवासस्थानांची आवश्यकता आहे. याबाबत कार्यासन क्र.२७-ब यांनी त्यांचे दि.१७/३/२०१६ चे ज्ञापान्वये सर्व घटक प्रमुखांना आवश्यक निवासस्थानाचे प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी पाठविण्याबाबत कळविले आहे. त्यास अनुसरुन पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी पुढील प्रमाणे अभिप्राय दिले आहेत :-<br>` पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांकरिता जिल्हयाच्या आस्थापनेवर मंजूर संख्याबळाच्या ७० टक्के व राज्य राखीव पोलीस बलाच्या आस्थापनेवर मंजूर संख्याबळाच्या ८० टक्के इतकी शासकीय निवासस्थाने उपलब्ध करुन देण्याचे शासनाचे धोरण असून त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नाव/घटकांचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| १८ | **४६ वी. क.वृ.प.**<br>**मुद्दा क्रमांक -१९ :-**<br><br>**मपोशि.क्र. ३३२/ मंगला आसूटकर चंद्रपुर**<br><br>**(का. क्र. २७-ब / २८-अ)** | महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांकरिता एक स्वतंत्र "हिरकणी" कक्ष असावा. ज्या कक्षाच्या आतमध्येच प्रसाधान गृहाची सुविधा असावी. जेणेकरुन त्या कक्षामध्ये लहान मुलं असलेले महिला पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना त्यांच्या बाळाला स्तनपान करतांना कोणतीही समस्या उद्‌भवणार नाही. तसेच महिला पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना काही वैद्यकीय अडचण निमार्ण झाल्यास सदर कक्षाचा लाभ घेता येईल. | सदरचा मुद्दा योग्य असून अशा कक्षाची उभारणी झाली पाहिजे. जेणेकरुन महिलांना कोणतीही समस्या निर्माण होणार नाही. याबाबत प्रस्ताव घटक कार्यालयांनी तयार करुन या कार्यालयास पाठवावा. | मुख्यालय व पोलीस स्टेशन ह्या ठिकाणी योग्य ती जागा पाहून महिला पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी प्रसाधनगृह, विश्रामगृह व मुलांच्या संगोपनासाठी पाळणाघर सुरु करण्याबाबतच्या व्यवस्थेविषयीचा पूर्तता अहवाल सर्व घटक प्रमुखांनी ३ महिन्यांत पाठविण्याबाबत सूचित करण्यात आले. | **कार्यासन क्र. २७-ब**<br>राज्यात २८४ पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता प्रसाधनगृह व विश्रामगृह उपलबध्द आहेत. तसेच ६७९ ठिकाणी महिला पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता प्रसाधनगृह व विश्रामगृह बांधकाम करण्याबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे.<br>**सदरचा मुद्दा २८-अ शी संबंधीत असल्याबाबत कार्यासन क्र. २७-ब यांनी दि.२६/७/२०१६ च्या ज्ञापान्वये कळविले आहे.**<br>**कार्यासन क्र.२८-अ :-**<br>क्र.पोमसं/२८-अे/४९३७/परिपत्रक-पाळणाघर/ २२७/१५(३१(१४)/२०१६,दि.२०/६/१६ अन्वये पोलीस मुख्यालयाच्या ठिकाणी पाळणाघरें सुरु करण्याबाबत संबंधीत घटकांना कळविले आहे. सध्या राज्यात २१ ठिकाणी पाळणाघरे सुरु करण्यात आलेली आहेत. तसेच २८ घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकामध्ये पाळणाघरे चालविण्याची आवश्यकता नाही असे कळविले आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | राज्यात २१ ठिकाणी पाळणाघरे सुरु करण्यात आलेली आहेत. तसेच २८ घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकामध्ये पाळणाघरे चालविण्याची आवश्यकता नाही असे कळविले आहे.<br>घटक प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील पोलीस ठाणे व कार्यालय येथे आवश्यकतेनुसार हिरकर्णी कक्ष बांधण्याबाबतची कार्यवाही करावी, व त्यासाठी येणारा खर्च कार्यालयीन खर्च / DCPR किंवा पोलीस कल्याण निधीतून करण्यात यावा.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात येत आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मु- | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| १९ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**मुद्दा क्र. १७**<br><br>बाळकृष्ण धनवान खांडेकर, सपोह/५९०, रा.रा.पो.बल, गट क्र. ९, अमरावती<br>**कार्यासन क्र. २८** | पोलीस दलातील वर्ग ४ चे कर्मचारी न्हावी, धोबी, भोजनसेवक व सफाईगार यांना महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ देण्यात यावा. | राज्य राखीव पोलीस बलातील वर्ग-४ चे कर्मचारी न्हावी, धोबी, भोजनसेवक व सफाईगार हे राज्य राखीव पोलीस बलातील कंपन्याबरोबर कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्ताकरिता शहरात तसेच ग्रामिण भागात, त्याचप्रमाणे नक्षलग्रस्त भागात कर्तव्यार्थ हजर राहत असल्याने, सदर कर्मचाऱ्यांना देखील महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ मिळण्याबाबत शासनास प्रस्ताव पाठवावा, असे अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत. | **कार्यासन क्र. २८ :-** राज्य राखीव पोलीस बलातील वर्ग ४ चे कर्मचारी न्हावी, धोबी, भोजनसेवक, व सफाईगार यांना महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेचा लाभ मिळण्याकरिता दि.२३/८/२०१६ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.<br>त्या अनुषंगाने शासनाने दि.२३/९/२०१६ च्या पत्रान्वये काही मुद्यांवर माहिती मागविली आहे. त्यानुसार अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून दि.५/१०/२०१६ च्या ज्ञापान्वये माहिती मागविलेली होती. त्यानुसार अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दि.२७/१२/२०१६ च्या पत्रान्वेय माहिती सादर केलेली होती. त्यांनी सादर केलेल्या माहितीच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या दि.८/३/२०१७ च्या ज्ञापान्वये अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कडून माहिती मागविण्यात आली असून, अद्याप सदरहू माहिती अप्राप्त आहे. | अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कडून माहिती मागविण्याचे निर्देश दिले आहेत. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मु‍े | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| २० | **४६ वी. क.वृ.प. आयत्यावेळी उपस्थित मुद्दा क्रमांक ६ :- पोलीस निरीक्षक, एस्.आय्.अली, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. १४, औरंगाबाद.**<br><br>**(का.क्र. २८-अे)** | पोलीस अधीक्षक पातळीवर पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलांकरिता ५ टक्के आरक्षण ठेवण्यात यावे. | पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलांकरिता ५ टक्के आरक्षण ठेवणे शक्य होणार नाही. पोलीस कर्मचाऱ्यांच्या मुलांना शाळेत प्रवेश मिळण्यासाठी जिल्हा स्तरावर घटकप्रमुख आपआपल्या स्तरावर / पातळीवर प्रयत्न करीत असतात. समादेशकांनी सुध्दा राज्य राखीव पोलीस बलातील कर्मचाऱ्यांच्या मुलांना शाळेत प्रवेश मिळण्यासाठी त्यांच्या स्तरावर प्रयत्न करावेत. | प्रस्तुत प्रकरणी सभासदांचे नक्की काय म्हणणे आहे हे जाणून घेतल्यानंतर आदेश निर्गमित करण्यात येतील. | कार्यासन क्र.२८-अ यांनी क्र.पोमसं/२८-अ/ ४९३७/शाळा प्रवेश प्राधान्य/३८/२०१६, दि.१०/२/२०१६ अन्वये शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांना विनंती केली आहे. त्यावर दि.१८/६/२०१६ अन्वये स्मरणपत्रही पाठविण्यात आले आहे. | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| २१ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**<u>मुद्दा क्र. १९</u>**<br><br>श्री. दिपक नथेंसिग गिरासे, पोलीस हवालदार क्रमांक ४०४/ रा. रा. पो. बल, गट क्र. ११ , नवी मुंबई<br><br>**<u>कार्यासन क्रमांक २८-अ</u>** | गट क्र. ११ हा कल्याण, डोंबिवली शहरापासून १८ ते २० कि.मी. अंतरावर असून नवी मुंबई, खारघरपासून १४ ते १५ कि.मी.अंतरावर आहे. गटातील १७० शासकीय निवासस्थानातील अधिकारी / कर्मचाऱ्यांना जीवनावश्यक वस्तु खरेदीसाठी नवी मुंबई व ठाणे शहर येथील सबसीडी कॅन्टीनमध्ये जावे लागते. तसेच, गटातील कंपन्या विविध ठिकाणी बंदोबस्ताकरीता असल्याने कर्तव्य सोडून कुटुंबियांकरीता येणे शक्य होत नाही. या सर्व अडचणींमुळे गट क्र. ११, नवी मुंबई येथे सबसिडीअरी कॅन्टीन सुरु करण्यात यावी. | प्रस्तुत प्रकरणी राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ११, नवी मुंबई येथे सबसिडीअरी कॅन्टीन सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्याबाबत समादेशक यांना कळविण्यात यावे. | राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ११, नवी मुंबई येथे सबसिडीअरी कॅन्टीन सुरु करण्यात आले आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नाव/घटकांचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| २२ | ४५ वी. क.वृ.प. <u>मुद्दा क्र. ९</u> श्री. बाबुराव वानखेडे, पोलीस शिपाई क्र.१७९३/अकोला<br><br><u>का.क्र. ३०</u> | वेतन नियम - २००९ (सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे) सन २००२ ते २००५ यावर्षी भरती झालेल्या कर्मचाऱ्यांना दि.१/१/२००६ रोजी वेतन निश्चिती करण्यात आलेली आहे. सन २००६ मध्ये भरती झालेल्या कर्मचाऱ्यांपेक्षा सन २००२ ते २००५ मध्ये भरती झालेल्या वरिष्ठ कर्मचाऱ्यांचे वेतन निश्चिती कमी होत असल्याने त्यांचेवर अन्याय होत आहे. सोबत, दि.६/१/२००६ चे पत्र जोडलेले आहे. सदरचा प्रस्ताव कृपया वेतन त्रुटी समितीकडे सादर करावा, जेणेकरुन वरिष्ठ व कनिष्ठ कर्मचाऱ्यांचे वेतनामधील तफावत दूर होईल. | सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून, त्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. सदर प्रस्ताव वेतन त्रुटी समितीसमोर ठेवण्याबाबत वरिष्ठ पातळीवर शासनाकडे पाठपुरावा करावा लागेल. तसेच सदर प्रस्ताव मा. मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशनास आणण्यांत येईल. | प्रस्तुत प्रकरणी वेतनसंरचनेतील तफावत दूर करण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. | प्रस्तुत प्रकरणी वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेपूर १२१०/प्र.क्र.१२४/(भाग-१)/सेवा-९, दि.९/२/२०१६ अन्वये वेतन निश्चितीसंबंधी सुचना निर्गमित केल्या आहेत. सदरच्या शासन निर्णयाची प्रत सर्व पोलीस घटकांना या कार्यालयाचे परिपत्रक क्र.पोमसं/३०/वेतननिश्चिती/कनिष्ठ-वरिष्ठ तफावत/सुधारणा/९१-२०१६, दि.७/४/२०१६ अन्वये पुरविण्यात आल्या आहेत. त्यामुळे वरिष्ठ व कनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या वेतनामधील तफावत दूर होणार असल्याने **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| २३ | ४५ वी. क.वृ.प. <u>मुद्दा क्र. २१</u> श्री. एच्. एस्. काटकर, स.फौ., सातारा.<br><br><u>का.क्र. ३०</u> | **<u>ॲन्टी करप्शन ब्युरो शाखेतील कामकाजाबाबत.</u>**<br>महाराष्ट्र राज्यातील ॲन्टी करप्शन ब्युरोमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कामकाजाबाबत, तसेच त्यांचे कल्याणाबाबत सर्वस्वी निर्णय घेण्याचे अधिकार महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारित आहेत. वास्तविक या विभागांमध्ये काम करणारे कर्मचारी हे क्लिष्ट स्वरुपाचे काम करीत आहेत. तसेच, त्यांना अविरतपणे शासनाचे इतर विभागांमध्ये काम करणारे अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द काम करावे लागते. त्यामुळे एक अपराधीपणाची भावना सतत वागवित हे अधिकारी / कर्मचारी काम | प्रस्तुत प्रकरणी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने सन २०१०-११ मध्ये शासनास परस्पर प्रस्ताव सादर केलेला आहे.<br>याबाबत संबधीत कार्यासनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सदर प्रस्तावाविषयीची माहिती घ्यावी. | प्रस्तुत प्रकरणी शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा, असे मा. अध्यक्षांनी सूचित केले आहे. | प्रस्तुत प्रकरणी या कार्यालयाचे क्र.पोमसं/२०/ला.लु.प्र.वि./दिडपट वेतन/१८३-२०१५, दि.७/१२/२०१५ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असून, त्यास दि.२५/१/२०१६, दि.२७/४/२०१६, व दि.२३/५/२०१६ व दि. ७/२/२०१७ रोजी शासनास स्मरणपत्रे पाठविण्यात आली आहेत. तथापि, शासन आदेश अद्याप प्रलंबित आहेत. याबाबत पाठपुरवा करण्यात येत आहे. | एक टप्पा पदोन्नती ज्या परिस्थितीत निर्माण झाली होती ती परिस्थिती राहिली नसून पोलीस उप अधीक्षकांची पदे मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्यामुळे ती परिस्थिती आता राहिली नाही. म्हणून एक टप्पा पदोन्नती बंद करण्याबाबत मा. अध्यक्षांनी मत व्यक्त केले आहे. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नाव/घटकांचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | करत असतात. तसेच, हे काम तांत्रिक स्वरुपाचे असते, यामध्ये लोक सेवकांच्या मालमत्तेची गुप्त चौकशी / उघड चौकशी इत्यादि बाबींचा समावेश होतो. त्या चौकश्यांमध्ये, लोक सेवकांची बँक खाती, मालमत्तेची सांख्यिकी माहिती, विमा योजना इत्यादि स्थावर व जंगम मालमत्तेची सांख्यिकी माहिती गोळा करुन त्याचा आलेख तयार करुन उत्पन्न, मालमत्ता, खर्च इत्यादींचा ताळमेळ लावून त्यामध्ये अपसंपदेच्या अपराधापर्यंत पोहोचून त्यावरुन त्यासंबंधीत लोक सेवकांवर गुन्हा दाखल केला जातो. या सर्व प्रक्रियेमध्ये कामकाज संगणकावर केले जाते, त्यामुळे यामध्ये तांत्रिक बाबींचा समावेश होतो. हे काम या शाखेतील कर्मचारी प्रामाणिकपणे हा विभाग स्थापन झाल्यापासून करीत आहेत. वरील सर्व कामकाज शासनाचे सर्व विभागांमधील काम करणारे अधिकारी / कर्मचाऱ्यांची या विभागातील काम करणारे अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या विषयी झालेली वाईट भावना या सर्वांचा विचार करता, या शाखेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विशेष मानधन देणे उचित आहे, अथवा दीडपट पगार देण्याबाबत शासनाने विचार व्हावा, अन्यथा भविष्यात या विभागामध्ये काम करण्याकरिता कर्मचारी मिळणार नाहीत, व शासनापुढे सध्या भेडसावत असलेला अत्यंत महत्त्वाच्या भ्रष्टाचार हा विषय असाच अनुत्तरीत राहील. या | | | | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नाव/घटकांचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | विभागामध्ये काम करणाऱ्या सहायक पोलीस निरीक्षक या पदापासून वर सर्व पदांकरिता एकटप्पा पदोन्नती व दीडपट पगार ही सुविधा पुरविली जात आहे. हीच कार्यपध्दती या शाखेमध्ये काम करणारे पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक या पदांकरिता का अवलंबिली नाही. वास्तविक मोठ्या शहरं ातील कामकाज वगळता, या शाखेतील सर्व कामकाज त्या-त्या युनिटला काम करणारी पोलीस शिपाई ते सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जाचे पोलीस कर्मचारी करीत आहेत. | | | | |
| २४ | **४६ वी. क.वृ.प.** <u>**मुद्दा क्रमांक १**</u> **श्री. राजेश प्रधान, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण** **(का .क्र. ३०)** | पोलीस दलातील पोलीस नाईक ते पोलीस हवालदार या पदोन्नतीमध्ये वेतनवाढ बॅन्ड ५२००-२०२००, ग्रेड पे २४००, असे समान वेतन देण्यात येते. पोलीस नाईक ते पोलीस हवालदार या पदावर पदोन्नती झाल्यावर ग्रेड पे मध्ये किंवा कोणतीही वेतनवाढ न देता पदोन्नती दिली जाते. इतर शासकीय खात्यामध्ये वरिष्ठ लिपिक यांचा ग्रेड पे २४०० वरुन २८०० करण्यात आला आहे. परंतु पोलीस हवालदार यांना देण्यात येणारी पदोन्नतीनुसार वेतनवाढ व ग्रेड पे मध्ये वाढ करण्यात येत नाही. तसेच, पोलीस हवालदार ते सहायक पोलीस उप निरीक्षकांच्या पदोन्नती झाल्यावर त्यांचे विशेष वेतन रुपये ५०० कपात करण्यात येते, त्यामुळे त्यांना मिळणाऱ्या वेतनवाढीमध्ये फारसा फरक मिळत नाही. | प्रस्तुत प्रकरणी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव वेतन त्रुटी समितीसमोर ठेवण्याविषयी पाठपुरावा करावा. तसेच, सदर प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणण्यात येईल. | शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत मा. अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत. | प्रस्तुत प्रकरणी शासन पत्र, गृह विभाग, क्र.पोलीस-१८१४/प्र.क्र.१५३/पोल-५अ, दि.८/३/१६ नुसार पोलीस हवालदार या संवर्गाच्या पदाच्या ग्रेड वेतनामध्ये सुधारणा करण्याबाबत वित्त विभागाच्या स्तरावर कार्यवाही करण्यात येत असल्याचे कळविले आहे. त्यानंतर शासनास दि.२३/५/१६, दि.१०/६/१६, दि.४/७/१६, दि.९/८/२०१६ च्या पत्रान्वये स्मरणपत्रे पाठविण्यात आलेली आहेत. यावर शासन पत्र, गृह विभाग, क्र.पोलीस-१८१४/प्र.क्र.१५३/पोल-५अ, दि.३/९/१६ च्या अन्वये परत पोलीस हवालदार या संवर्गातील विविध प्रकार आढळून येत असून त्याबाबत स्पष्टीकरण मागविण्यात आले होते. सदरच्या पत्रान्वये या कार्यालयाकडून | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नाव/घटकांचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | यथायोग्य खुलासा शासनास दि.७/१०/१६ च्या पत्रान्वये सादर केला आहे. त्यावर शासनाने दि.२०/१२/१६ रोजी स्मरणपत्र पाठविण्यात आलेले आहे. अद्याप त्यावरील शासनास आदेश प्रलंबित आहे. याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. | |
| २५ | **४६ वी. क.वृ.प.** **<u>मुद्दा क्रमांक २</u> :-** **श्री.राजेश प्रधान, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण** **(<u>कार्यासन क्र. ३०</u>)** | पोलीस दलातील पोलीस शिपाई, पोलीस नाईक, पोलीस हवालदार, सहायक पोलीस उप निरीक्षक अशी चार पदे असून त्यांचे वेतन श्रेणी ५२००-२०२०० अशी असून पोलीस नाईकापासून पुढे पदोन्नती मिळणाऱ्या प्रत्येक पदामध्ये ग्रेड पे २०००, २४००, २८००, ४२०० या प्रमाणे देण्यात यावा. | प्रस्तुत प्रकरणी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्ताव वेतन त्रुटी समितीसमोर ठेवण्याविषयी पाठपुरावा करावा. तसेच, सदर प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणण्यात येईल. | **वरील प्रमाणे** | **वरील प्रमाणे** | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| २६ | **४६ वी. क.वृ.प.** **सभासद नसलेले** **<u>मुद्दा क्रमांक ५</u> :-** **डॉ.आारती सिंह, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण** **(<u>कार्यासन</u>** | सध्या अर्धवेळ अंशकालीन सफाई कामगार यांना दरमहा रुपये १,२००/- देण्यात येत आहे. महागाई पाहता, हे वेतन पुरेसे ठरत नाही. तरी वेतनात वाढ करणे आवश्यक आहे. | यासंदर्भात शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला असल्याने, त्याबाबत कार्यासनाने शासनाकडे पाठपुरावा करावा. | प्रस्तुत प्रकरणी वेतनवाढ देण्याबाबत संबंधीत कार्यासनाने शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत मा.अध्यक्षांनी सूचित केले आहे. | विविध पोलीस घटक कार्यालया ठिकाणी नेमणुकीस असलेल्या सर्व अंशकालीन सफाई कामगारांना समान वेतन मिळावे, त्यांचे कामाचे स्वरुप / कार्य प्रमाण / कामाचा वेळा इत्यादी बाबी निश्चित करुन त्यामध्ये एकसुत्रीपणा यावा, त्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन मिळावे म्हणून प्रस्तुत प्रकरणी शासनास या कार्यालयाचे | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नाव/घटकांचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | **क्र. ३०**) | | | | क्र.पोमसं/३०/अं.सं.का./पो.अ.ठाणे ग्रा./ २२५-२०११, दि.४/११/२०१५ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. त्यावर कार्यालयाकडून दि.१८/१२/२०१५, दि.१५/१/२०१६, दि.३/३/२०१६, दि.१६/४/२०१६, दि.५/५/२०१६, दि.२०/५/२०१६, दि.१७/०६/२०१६, दि.४/७/२०१६ व दि.१०/८/२०१६ अन्वये स्मरणपत्रे पाठविण्यात आली होती.<br>परंतू शासन पत्र, गृह विभाग, क्र.पीएए-०३१२/प्र.क्र.८६/पोल-५अ, दि.०६/०१/२०१७ च्या नुसार कळविले आहे की, अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या वेतन दरात सुधारणा करण्याचा शासन निर्णय दि.६/९/२०१० रोजी निर्गमित करण्यात आला आहे. यातील तरतूदीनुसार नियम / एकत्रिकृत वेतनावर असलेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांचे वेतन सध्या असलेल्या वेतनाच्या दुप्पट करण्यात आले आहे. ही वाढीव रक्कम किमान रु. ६००/- ते कमाल रु.१,२००/- च्या मर्यादेत राहील रु.१,२००/- पेक्षा जास्त नियम / एकत्रिकृत वेतन घेत असलेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या वेतनात कोणताही बदल होणार नाही, तशी तरतूद या शासन निर्णयात केली आहे.<br>तथापी विविध विभागाकडून | |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नाव/घटकांचे नांव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | अध्यक्षांचे अभिप्राय/आदेश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या राज्य वेतन सुधारणा समिती, २००८ च्या शिफारशी ऐवजी उद्योग, उर्जा व कामगार विभागप्रमाणे किमान वेतन कायदा लागू करण्यासाठीचे विनंती प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यानुषंगाने किमान वेतन कायदा लागू करावयाचा झालयास, अंशकालीन कर्मचारी किती तास काम करतात, त्यांचे कार्यप्रमाण किती याबाबतची माहिती उपलब्ध नाही व सदर माहिती अभावी किमान वेतन अधिनियम लागू केल्यास किती आर्थिक भार देईल याची परिगणना करता येत नाही. यासाठी सर्व विभागांकडून माहिती मागविण्यात येत असून अद्याप काही विभागांची माहिती अप्राप्त आहे. सदर प्रकरणी कार्यवाही चालू आहे. अंतिम निर्णय झालेला नाही. | |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव</th><th>सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मु-</th><th>अध्यक्षांचे आदेश</th><th>संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय</th><th>अध्यक्षांचे आदेश</th></tr>
<tr><td>२७</td><td>४७ वी. क.वृ.प.<br><u>मुद्दा क्र. १</u><br>मनोज बाबुराव सावंत, पोहवा/५८२७, मध्यवर्ती पोलीस ठाणे, ठाणे शहर.<br><u>का. क्र. ३०.</u><br><br><u>मुद्दा क्र. २</u><br>(मुद्दा क्रमांक १५ मध्ये सदर मुद्दा उपस्थित आहे)<br><br>बाळकृष्ण धनवान खांडेकर, सपोह/५९०, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ९, अमरावती<br><u>कार्यासन क्रमांक ३०</u></td><td>पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे वाहन भत्त्यात वाढ होणे बाबत.<br><br>वाढत्या महागाईचे दृष्टीकोनातून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या प्रवास भत्त्यामध्ये वाढ होणेस विनंती आहे.</td><td>प्रस्तुत प्रकरणी पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांना त्यांच्या वेतनात त्यांनां ग्रेड पे नुसार वाहतूक भत्ता देण्यात येत असल्याचे तपासावे. जर वाहतूक भत्ता देण्यात येत नसल्यास, त्यानुसार शासनास प्रस्ताव सादर करावा.</td><td>सर्व शासकीय कर्मचाऱ्यांना तसेच पोलीस कर्मचाऱ्यांना त्यांच्या ग्रेड वेतनानुसार दि.१/४/२०१० पासून वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वाहभ-२०१४/प्र.क्र.५/सेवा-५, दि.३/६/२०१४ अन्वये खालील नमूद केल्याप्रमाणे वाहतुक भत्ता देय आहे :-<br><table>
<tr><th rowspan="2">अ. क्र.</th><th rowspan="2">कर्मचाऱ्यास अनुज्ञेय ग्रेड वेतन</th><th colspan="2">दरमहा वाहतूक भत्त्याचा दर (रु.)</th></tr>
<tr><th>अ-१ व अ वर्ग शहरे</th><th>इतर ठिकाणे</th></tr>
<tr><td>१</td><td>५,४०० किंवा त्याहून अधिक</td><td>२,४००/-</td><td>१,२००/-</td></tr>
<tr><td>२</td><td>४,४००/- किंवा त्याहून अधिक</td><td>१,२००/-</td><td>६००/-</td></tr>
<tr><td>३</td><td>४,४००/- पेक्षा कमी</td><td>४००/-</td><td>४००/-</td></tr>
</table>व त्यानुसार कर्मचाऱ्यांच्या वेतनात त्यांची आकारणी होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे शासनास नव्याने प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता नाही.<br>सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.</td><td>कर्मचारी वृंद परिषद समितीच्या निवडक सभासदांसह समितीची स्थापना करुन नवीन मोटार सायकल खरेदी करावी अथवा मोटार सायकल भत्ता द्यावा, याबाबत निर्णय घेऊन शासनास प्रस्ताव सादर करावा. मोटार परिवहन विभागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात यावेत, व विभाग निहाय किती पेट्रोल देण्यात आले याबाबतची तपासणी करावी, असे मा. अध्यक्षांनी आदेश दिले आहेत.</td></tr>
<tr><td>२८</td><td>४७ वी. क.वृ.प.<br><u>मुद्दा क्र. ७</u><br>आर.बी.पुरकर, पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (अभि.), म.राज्य, पुणे<br><br><u>का. क्र. ३०.</u></td><td>पोलीस बिनतारी विभागातील पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) हे पद कार्यकारी पोलीस दलामधील पोलीस शिपाई पदाचे समकक्ष आहे, परंतु, त्यांचे वेतन श्रेणी मध्ये खालील प्रमाणे फरक आहे.<br><table>
<tr><th>१</th><th>पदनाम</th><th>वेतनश्रेणी</th><th>ग्रेड वेतन</th></tr>
<tr><td>१.</td><td>पोलीस शिपाई (कर्मशाळा</td><td>५२००-२०२०० + १८००</td><td>१८००</td></tr>
</table></td><td>पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांना पोलीस शिपाई (कार्यकारी दल) प्रमाणे वेतनश्रेणी दिल्यास शासनास किती आर्थिक भार सोसावा लागेल, ही बाब शासनाच्या निदर्शनास आणून पोलीस शिपाई (कर्मशाळा</td><td>कार्यासन क्र. ३० यांनी त्यांचे पत्र क्र.पोमसं/३०/ कर्मशाळा मदतनीस/बि.सं./ग्रेड वेतन/सुधारणा/१२९-२०१६, दि.१५/७/२०१६ अन्वये शासनास प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे.</td><td>मा. अध्यक्षांनी ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने शासनास माहिती/ शिफारशी सादर करण्याबाबत निर्देश दिले आहेत.</td></tr>
</table>

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव</th><th>सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मु-</th><th>अध्यक्षांचे आदेश</th><th>संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय</th><th>अध्यक्षांचे आदेश</th></tr>
<tr><td></td><td></td><td><table><tr><td></td><td>मदतनीस)</td><td>ग्रेड पे</td><td></td></tr><tr><td>२.</td><td>पोलीस शिपाई (कार्यकारी दल)</td><td>५२००-२०२०० + २००० ग्रेड पे</td><td>२०००</td></tr></table>त्याअनुषंगाने पोलीस बिनतारी विभागातील पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) या पदास कार्यकारी पोलीस दलामधील पोलीस शिपाई पदाची वेतनश्रेणी देणेसंदर्भात कार्यवाही होणेस विनंती आहे.</td><td>मदतनीस) यांना पोलीस शिपाई (कार्यकारी दल) प्रमाणे वेतनश्रेणी देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत.</td><td></td><td></td></tr>
<tr><td>२९</td><td>४७ वी. क.वृ.प.<br><u>मुद्दा क्र. ८</u><br>आर.बी.पुरकर, पोलीस उपनिरीक्षक, बिनतारी संदेश (अभि.), म.राज्य, पुणे<br><u>का. क्र. ३०.</u></td><td>नियमित पदोन्नतीपासून वंचित राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना कुंठितता घालविणेसाठी आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत पुढील पदोन्नतीची वेतनश्रेणी देण्यात येते.<br>पोलीस बिनतारी संदेश विभागांतर्गत पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांना एकाच पदावर सलग १२ वर्षे सेवा झालेनंतर पुढील १२ वर्षे पुढील वेतन श्रेणीमधील पहिला लाभ देण्यात येतो. (पोलीस शिपाई ५२००-२०२००, ग्रेड वेतन-२४००) पहिल्या लाभानंतर एकाच पदावर सलग पुढील १२ वर्षे सेवा झालेनंतर देण्यात येणाऱ्या आश्वासित प्रगती योजनांतर्गत २४ वर्षानंतर दुसऱ्या लाभाच्या वेतनश्रेणीमध्ये त्यांना कोणत्याही प्रकारचा फायदा मिळत नाही.<br>त्याअनुषंगाने पोलीस बिनतारी विभागामधील पोलीस शिपाई (कर्मशाळा मदतनीस) यांना आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत दुसऱ्या लाभाचे वेतनश्रेणीमध्ये सुधारणा होऊन त्यांना योग्य ते लाभ मिळणेसंदर्भात कार्यवाही होणेस विनंती आहे.</td><td>प्रस्तुत प्रकरणी सुधारीत प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत.</td><td>पदोन्नतीच्या संधी नसलेल्या एकाकी पदांच्या कर्मचाऱ्यांना सुधारित सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना अंतर्गत पहिल्या लाभानंतर १२ वर्षाची नियमीत सेवा पुर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना सदर योजना दुसरा लाभ कशा पध्दतीने देण्यात यावा याबाबत वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-११०९/प्र.क्र.४१/सेवा-३, दि.५/७/२०१० अन्वये स्पष्टरित्या निर्देश दिलेले असल्याने, <u>सदर मुद्यांत नमूद कर्मचाऱ्यांना देखील त्यानुसार आश्वासित प्रगतीचा दुसरा लाभ देय राहिल. शासनाचा याबाबत स्वयंस्पष्ट निर्णय असल्याने</u> सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.</td><td>चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.</td></tr>
</table>

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मु- | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| ३० | **४७ वी. क.वृ.प.**<br>**<u>मुद्दा क्र. १२</u>**<br>श्री.एस्.आय्.अली, पोलीस निरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ६, धुळे<br><br>**<u>का. क्र. ३०.</u>**<br><br>**(मुद्दा क्रमांक २१ प्रमाणे आहे.)**<br><br>**<u>मुद्दा क्र. १३</u>**<br>श्री.रविंद्र बळीराम दामोदर,<br>सहायक पोलीस निरीक्षक,<br>पोलीस प्रशिक्षण विद्यालय, अकोला.<br><br>**<u>कार्यासन क्रमांक ३०</u>** | पोलीस अधिकाऱ्यांना ४ वर्षातून एकदा रुपये ५,०००/- गणवेष भत्ता मंजूर करण्यात येतो. परंतु, आजमितीस स्थानिक बाजारातील दर हे अतिशय मोठ्या प्रमाणात वाढविलेले आहेत. त्याअनुषंगाने सदरची रक्कम ही कमी पडत असल्याने त्यात वाढ होणे जरुरीचे आहे. रुपये ५,०००/- गणवेष भत्त्यामध्ये वाढ होवून ४ वर्षामध्ये एकदा रुपये १०,०००/- अथवा ४ वर्षाचा कालावधी कमी करुन त्याऐवजी २ वर्षाचा कार्यकाल ठेवल्यास अधिकाऱ्यांना दरवर्षाला नवीन गणवेष शिलाई करणे सोयीचे होईल.<br>सध्या स्थित नियमानुसार राज्यातील पोलीस उपनिरीक्षक ते पोलीस निरीक्षक पदाच्या सर्व अधिकारी यांना गणवेश भत्ता म्हणून रुपये ५,०००/- चार वर्षाकरीता देण्यात येतो. सध्या परिस्थीती नुसार महागाई व दरवाढी नुसार रुपये ५,०००/- भत्ता अपुरा पडतो. नजीकच्या काळात पोलीस कर्मचाऱ्यांचे करीता गणवेश भत्याबाबत नव्याने आदेश करण्यात आले आहे, त्या अनुषंगाने विचार होण्यास विनंती. | प्रस्तुत प्रकरणी ४ वर्षातून एकदा रुपये १०,०००/- अथवा ०२ वर्षातून एकदा रुपये ५,०००/- याप्रमाणे बदल केल्यास शासनास आर्थिक भार किती सोसावा लागेल याबाबत विचार करुन, शासनास प्रस्ताव सादर करण्याबाबत अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत. | पोलीस उप निरीक्षक व त्यावरील हुद्यांच्या अधिकारी वर्गास ४ वर्षातून एकदा रु.१२,०००/- (एका वर्षासाठी रु.३,०००/-प्रमाणे) इतके अनुदान मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/ ३०/गणवेश भत्ता वाढ/१७८-२०१५, दि.७/४/२०१६ नुसार शासनास सादर करण्यात आलेला आहे.<br>**त्यास दि.२८/४/२०१६, दि.२०/५/२०१६, आणि दि.१४/६/२०१६ च्या पत्रान्वये पुन्हा विनंती करण्यात आली आहे. यावरील शासन आदेश अद्यापर्यंत प्रलंबित आहेत.** | **शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत मा. अध्यक्षांनी आदेश दिले आहेत.** |
| ३१ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**<u>मुद्दा क्र. १४</u>**<br>श्री.शिवदत्त गणपत मालंडकर,<br>सहायक गुप्तवार्ता अधिकारी,<br>राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.<br><br>**<u>का. क्र. ३०.</u>** | २००६ च्या सहाव्या वेतन आयोगात पोलीस नाईक ते पोलीस हवालदार यांच्या पदोन्नतीच्यावेळी मूळ वेतनात कोणताही बदल करण्यात आलेला नाही. याला कारण तत्कालीन वेतन निश्चिती करणाऱ्या समितीत या प्रवर्गातला जाणकार व्यक्ती नेमलेला नव्हता. तरी आगामी सातव्या वेतन आयोगाच्या वेतन निश्चिती करणाऱ्या समितीत जबाबदार व पोलीस हवालदार / पोलीस नाईक यांची नेमणूक करण्यात यावी जेणेकरुन त्यांच्यावर होणाऱ्या न्यायाबाबत ते तात्काळ वरिष्ठांच्या निदर्शनास सदर बाब आणतील. | प्रस्तुत प्रकरणी संबंधीत कार्यासनाने सभासद श्री.मालंडकर यांना बोलावून प्रस्ताव तयार करतांना त्यांची मदत घ्यावी. | सातव्या आयोगाबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणतीही घोषणा अगर निर्णय घेतलेला नाही. ७ व्या आयोगाबाबत माहिती सादर करताना पोलीस विभागातील कोणत्याही पदाचे आर्थिक नुकसान होणार नाही याची सर्वतोपरी काळजी घेऊन शासनास त्याप्रमाणे अहवाल सदर करण्याची दक्षता घेतली आहे. त्याअनुषंगाने सध्या पोलीस महासंचालक कार्यालयात कामकाज चालू आहे. **<u>७ व्या वेतन आयोगाच्या समितीस योग्य त्या शिफारशी कळविण्यात येतील</u>** | **७ व्या वेतन आयोगासंदर्भात शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत निर्देश दिले आहेत.**<br>**चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मु‍े | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| ३२ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**मुद्दा क्र. १४**<br>श्री.मनोज बाबुराव सावंत,<br>पो.ह.५८२७/ठाणे शहर<br><br>**कार्यासन क्रमांक ३०** | पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना किरकोळ रजेवर किती प्रमाणात सोडले जावेत. | पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या रजांचा विचार करुन, रजेवर जाणाऱ्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांची संख्या १०% जास्त असता कामा नये. | सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आल्याने कार्यवाही काही नाही. | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मु- | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| **३ ३** | **४७ वी. क.वृ.प.**<br>**मुद्दा क्र. १५**<br><br>श्री.शिवदत्त गणपत मालंडकर,<br>सहायक गुप्तवार्ता अधिकारी,<br>राज्य गुप्तवार्ता विभाग,<br>महाराष्ट्र राज्य, मुंबई.<br><br>**कार्यासन क्रमांक ३०** | पोलीस नाईक हे पद पोलीस शिपायास अंदाजे २०/२१ वर्षानंतर पदोन्नतीवर मिळते. त्यानंतर पोलीस शिपाई २५/२६ वर्ष होवूनही पोलीस हवालदाराची पदोन्नती मिळत नाही. त्यामुळे पोलीस नाईक हे पद रद्द करुन सरळ पोलीस हवालदार, त्यानंतर सहायक पोलीस उपनिरीक्षक व निवृत्तीच्यावेळी पोलीस शिपायांना पोलीस उपनिरीक्षक हे पद सेवाज्येष्ठतेने मिळाल्यास सर्वांना सोयीस्कर होईल. कर्नाटक, पंजाब व राजस्थान या राज्यांमधील मा.पोलीस महासंचालकांनी तेथील शासनास अशा प्रकारचा प्रस्ताव पाठवून तेथील पोलीस कर्मचाऱ्यांना उपरोक्त प्रकारची पदोन्नती देत असल्याचे समजून येत आहे. तरी वरिष्ठांमार्फत शासनास असा प्रस्ताव सूचित करण्यास विनंती आहे. त्यामुळे पोलीस खात्यात व्यावसायीकरित्या काम करण्याची मानसिकता वाढेल. त्याचे चांगले परिणामही वरिष्ठ व शासनाला पहायला मिळतील. | प्रस्तुत प्रकरणी ग्रेड वेतन वाढविण्याबाबतचा प्रस्ताव शासन विचाराधीन असुन, पाठपुरवा करण्याबाबत अध्यक्षांनी निर्देश दिलेले आहेत | **कार्यासन क्रमांक ३०:-** पुर्वी पोलीस शिपाई या पदावरुन पोलीस हवालदार या पदावर पदोन्नती मिळण्यास सर्वसाधारणपणे १५ ते १८ वर्षाचा सेवाकाल व्यतीत होत असे. कर्मचाऱ्यांना लवकर पदोन्नती मिळावी यादृष्टीने शासनाने सन १९९३ पासून पोलीस शिपाई व पोलीस हवालदार या पदांमध्ये पोलीस नाईक या पदाची निर्मिती केली. आता पोलीस शिपाई या पदावरुन पोलीस नाईक हे पदोन्नती टप्प्यातील दुसरे पद आहे. **परंतू सहाव्या वेतन आयोगात पोलीस हवालदार व पोलीस नाईक या पदांची वेतनश्रेणी व ग्रेड वेतन एकच केल्याने पोलीस नाईक या पदावरुन पोलीस हवालदार या पदावर पदोन्नती मिळाल्यास वेतनश्रेणी एकच असल्याने वेतननिश्चिती होत नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांना त्या ठिकाणी कोणताही आर्थिक फायदा होत नाही.**<br>**पोलीस नाईक व पोलीस हवालदार या पदासाठी वेगवेगळे ग्रेड वेतन मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधिन आहे.** त्यामुळे कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी लवकर प्राप्त होऊन त्यांना आर्थिक फायदा देखील होणार आहे. त्यामुळे पोलीस नाईक हे पद रद्द करणे योग्य नाही. **तरी सदरच्या मुद्दयाबाबत चर्चेअंती निर्णय घेण्यात यावा.** | सदर मुद्यावर अधीच चर्चा झाली आहे.<br>**चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी/कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मु- | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| ३४ | **४६ वी. क.वृ.प. आयत्यावेळी उपस्थित मुद्दा क्रमांक २ :- पोलीस निरीक्षक, मारुती ज्ञानदेव मगदुम, भायखळा पोलीस ठाणे, बृहन्मुंबई.**<br><br>**(का. क्र. २८)**<br>**का.क्र. ३१** | महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेमध्ये गुडयावरील शस्त्रक्रियेचा समावेश होण्याबाबत, तसेच वैद्यकिय बिलांमध्ये वारंवार त्रुटी काढून बिले परत केली जातात. त्यामुळे रक्कम मिळण्यास विलंब होतो. यावर उपाय योजून वैद्यकिय बिले तातडीने मंजूर होतील अशी उपाय योजना करण्याबाबत. | महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेमध्ये ज्या आजारांचा समावेश करण्यात आलेला आहे, त्या तातडीच्या आजारांमध्ये "गुडग्यावरील शस्त्रक्रिया" हा आजार मोडत नाही. महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना ही विनाखर्च स्वरुपाची आहे. परंतु, कर्मचाऱ्याने वैद्यकिय कारणास्तव स्वत: खर्च केलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती मिळण्यासाठी वैद्यकिय देयक सादर केल्यानंतर त्यात त्रुटी राहू नयेत, म्हणून कार्यालयामध्ये एका कर्मचाऱ्याची नेमणूक करण्यात येवून त्याने सदरची देयके तपासून त्रुटीरहित परिपूर्ण वैद्यकिय देयक कोषागारात सादर करुन, संबंधितांना वैद्यकिय प्रतिपुर्तीची रक्कम लवकरात लवकर अदा करण्याबाबतची कार्यवाही करावी. | विविध पोलीस घटकांतील पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांची वैद्यकिय प्रतिपुर्तीची देयके सिव्हील सर्जनकडे न पाठविता पोलीस सर्जन कडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत मा.अध्यक्षांनी निर्देश दिले. तसेच, वैद्यकिय देयक लवकरात लवकर पारीत होऊन देयकाची रक्कम संबंधीतांना वेळीच प्राप्त व्हावी, याकरिता, सर्व घटकातील संबंधीत लिपिक व कार्यालय अधीक्षकांची कार्यशाळा आयोजित करुन, त्यांना वैद्यकिय देयक तयार करतांना मार्गदर्शनपर आवश्यक त्या सूचना/निर्देश देण्याबाबत सुचविले व याबाबतचा पूर्तता अहवाल १५ फेब्रुवारी पर्यंत मा.पोलीस महासंचालकांच्या अवलोकनार्थ सादर करण्याबाबत आदेश दिले. | कार्यासन क्र.३१ यांनी त्यांचे परिपत्रक क्र. पोमसं/३१/वै.दे./क.वृ.प.(४७)/३०७/२०१५, दि.२९/१२/२०१५ अन्वये शासकीय कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्तीची देयके सादर करणे बाबत परिपत्रक निर्गमित केले आहे. सर्व घटक प्रमुखांकडुन मार्च, २०१७ अखेर प्रलंबित वैद्यकिय देयकांबाबतची माहिती मागविण्यात येत आहे.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | वैद्यकीय देयकांच्या प्रतिपूर्ती संबंधात नवीन सॉफ्टवेअर तयार केले असून, संबंधीतांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. या कार्यालयाकडून लक्ष पुरविण्यात येते. महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेमधून लाभ मिळण्याबाबतची अशी योजना भारतामध्ये अन्य राज्यांमध्ये नाही. सदरच्या योजनेमधून गरजवंत अधिकारी/कर्मचारी सदर योजनेचा लाभ घेत आहेत. ज्याप्रकारे ही योजना चालू आहे. त्याप्रमाणे सदरची योजना चालू ठेवावी. **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे / घटकाचे नाव | सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मु- | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे आदेश / निर्देश | अध्यक्षांचे निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश / निर्देश |
|---|---|---|---|---|---|---|
| ३५ | **४६ वी. क.वृ.प.** **<u>मुद्दा क्रमांक ४ :-</u>** **डॉ.आरती सिंह, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण** <br><br> **(<u>का क्र. ३५</u>)** | पोलीस कोठडीत कैद्यासाठी सद्या प्रतिदिन रु.४०/- असे दर शासनाने ठरवुन दिलेले आहेत. सदर दराप्रमाणे आहार पुरविणे शक्य नसल्याबाबत काही कंत्राटदार यांनी सांगितले आहे. त्यामुळे सदर दरात वाढ होणे आवश्यक आहे. | पोलीस कोठडीतील कैद्यांना देण्यात येणाऱ्या आहाराचे दर वाढविण्या बाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला असल्याने, त्याबाबत कार्यासनाने शासनाकडे पाठपुरावा करावा. | प्रस्तुत प्रकरणी संबधित कार्यासनाने शासनाकडे पाठपुरावा करण्या बाबत अध्यक्षांनी सूचित केले आहे. | शासन निर्णय क्र.एम्आय्एस्-०५०९/प्र.क्र.१०५/पोल-८, दि.२६/२/२०१० अन्वये दि.१/४/२०१० पासून<br>(१) बृहन्मुंबई रेल्वे क्षेत्र व इतर महानगरपालिका क्षेत्र येथील पोलीस कोठडीतील कैद्यांसाठी-प्रतिदिन प्रतिडोई रु.५०/-<br>(२) उर्वरित महाराष्ट्रातील पोलीस कोठडीतील कैद्यांसाठी-प्रतिदिन प्रतिडोई रु.४०/- असा लागू आहे.<br>वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर पोलीस कोठडीतील कैद्यांना आहार पुरविण्यासाठी आहारभत्त्याचे दर वाढविण्याबाबत सर्व घटक कार्यालयांकडून माहिती मागविण्यात आली होती. सदरहू प्राप्त माहिती व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे प्रस्तावाचे आधारे **बृहन्मुंबई रेल्वे क्षेत्र व इतर महानगरपालिका क्षेत्र येथील पोलीस कोठडीतील कैद्यांसाठी प्रतिदिन प्रतिडोई रु.१५०/-**<br>**(२) उर्वरित महाराष्ट्रातील पोलीस कोठडीतील कैंद्यांसाठी-प्रतिदिन प्रतिडोई रु.१००/-** अशी दरवाढ होण्याबाबतचा प्रस्ताव, या कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/३५/२८०१/एसीएम/५/२०१४, दि.११/११/२०१४ अन्वये शासनास सादर करण्यात आला आहे. तसेच, मा. अध्यक्षांनी दिलेल्या आदेशानुसार दि.२६/२/२०१५,दि.६/४/२०१५,दि.२९/६/२०१५,दि.५/८/२०१५,दि.५/९/२०१५, दि.२१/१०/२०१५ च्या पत्रान्वये तसेच, दि.९/१२/२०१५, दि.८/२/२०१६, दि.१९/३/२०१६ च्या अ.शा. पत्रान्वये शासनास स्मरणपत्र सादर करण्यात आली आहेत. दि.२८/६/२०१६ व दि.६/०८/२०१६ चे पत्रान्वये शासनास पुन्हा विनंती करण्यात आलेली होती. सदरहू पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन गृह विभाग यांचे क्र.एम्आय्एस् २०१४/प्र.क्र.७४/पोल-११, दि.७/१२/२०१६ च्या पत्रान्वये चार मुद्यांची माहिती मागविण्यात आलेली आहे. त्यापैकी तीन मुद्यांची माहिती या कार्यालयाचे दि.२०/१२/२०१६ च्या पत्रान्वये शासनास सादर केलेली आहे. शासन पत्रातील उर्वरित एका मुद्याची माहिती ही संकलित करुन या कार्यालयाचे दि.०३/०३/२०१७ च्या पत्रान्वये शासनास सादर केली आहे. सद्यस्थितीस या कार्यालायाच्या स्तरावरुन करावयाची कोणतीही कार्यवाही प्रलंबित नाही. | **शासनाकडे पाठपुरावा करण्या बाबत मा. अध्यक्षांनी आदेश दिले आहेत. तसेच, अपर मुख्य सचिवांसोबतच्या बैठकीत याबाबत पाठपुरावा करण्यात येईल.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मु- | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| ३६ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**मुद्दा क्र ६**<br>बाळकृष्ण धनवान खांडेकर, सपोह/५९०, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. ९, अमरावती<br>**अपोमसं, रारापोबल, म.रा., मुंबई** | राज्य राखीव पोलीस दलाच्य कंपन्या मालेगांव जिल्हा नाशिक येथे कर्तव्यार्थ असतांना त्यांना राहण्याकरिता व मेस करिता सोयीसुविधा पुरविण्यात यावी. | राज्य राखीव पोलीस बलाच्या मालेगांव नाशिक येथे कायम तैनात असलेल्या कंपन्यां करिता १०० जण एकत्र राहू शकतील अशाप्रकारे बॅरेक्स उपलब्ध करुन देण्याबाबत, अपर पोलीस महासंचालक (नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना निर्देश देवून, तसेच मुंबई, ठाणे, भिवंडी व नाशिक ग्रामीण अशा ठिकाणी बंदोबस्तासाठी राज्य राखीव पोलीस बलाच्या कायम तैनात करण्यात आलेल्या कंपन्यांच्या सोयीसुविधांसाठी जागा उपलब्ध असल्यास अहवाल सादर करण्याबाबत पोलीस आयुक्त, मुंबई व ठाणे आणि पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण / नाशिक ग्रामीण यांना कळविण्याबाबत अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत. | अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, म.राज्य, मुंबई यांनी त्यांचे पत्र दि.२/८/२०१६ अन्वये सदरचा मुद्दा ४७ व्या राज्य स्तरीय क.वृ.प. सभेमध्ये उपस्थित केला असता निकाली काढण्यात आला आहे. सदर मुद्दा ४८ व्या राज्य स्तरावरील पोलीस कर्मचारी वृंद परिषदमध्ये चर्चेकरीता पाठवावयाची गरज नसल्याबाबत कळविले आहे. | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नाव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे | अध्यक्षांचे आदेश | संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय | अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|---|---|
| ३७ | **४७ वी. क.वृ.प.**<br>**मुद्दा क्र. १२**<br>श्री. सादिक अकबर पठाण, पोलीस उप निरीक्षक, मोटार परिवहन विभाग, नागपाडा, मुंबई.<br>**अ.पो.म.सं., प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.** | सध्याचे पोलीस वाहन चालक हे प्रशिक्षित असल्याने, ते ठरावित कालावधीनंतर पोलीस कार्यकारी दलामध्ये बदली होऊन जातात. याकरिता, पोलीस वाहन चालक पदाकरिता शैक्षणिक पात्रता दहावी (S.S.C.) उत्तीर्ण करावी. | प्रस्तुत प्रकरणी विचार चालू असल्याचे अध्यक्षांनी सांगितले. | सदर मुद्याच्या अनुषंगाने, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई व विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून कार्यवाही सुरु आहे. त्याबाबत अंतिम निर्णय झाल्यास, पोलीस शिपाई चालक या पदासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हतेबाबत सेवाप्रवेश नियमामध्ये समावेश करणे आवश्यक आहे असे, अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. प्रशि/पो.शि.-भरती /कृ.वृ.प.-४७वी सभा/५४१/२०१६/ २४६६, दि.२/६/१६ अन्वये पोलीस महासंचालक कार्यालयास (कार्यासन क्रमांक २६-ब) यांच्याकडे अभिप्राय पाठविण्यात आलेले आहेत. | नवीन वाहन चालक संवर्गाबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. त्याबाबत **शासनाकडे पाठपुरावा करण्याचे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत.** |

# ४८ व्या राज्य पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्यांवर माननीय अध्यक्षांनी आढावा घेऊन दिलेल्या सूचना.

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | **मुद्दा क्र. ०१**<br><br>श्रीमती निलीमा आराज,<br>पोलीस निरीक्षक,<br>महिला सहाय्य कक्ष,<br>अमरावती शहर<br>**कार्यासन क्रमांक १ ते ६** | पोलीस खात्यात महिला अधिकारी यांना दुय्यम स्थान देण्यात येत असून महिला अधिकारी निष्क्रीय असल्याबाबत वारंवार टिप्पणी केली जाते. तसेच महिला अधिकाऱ्यांकडे फक्त महिला विषयक गुन्हे हाताळण्यास न देता सर्व प्रकारचे गुन्हे तपासाकरिता देण्यात यावे. महिला आधिकाऱ्यांचे पदनामापुढे नेहमी महिला पोलीस उप निरीक्षक, महिला पोलीस निरीक्षक असे नमुद केले जाते. महिला न लिहीता फक्त पदनामाची नोंद असावी. | **कार्यासन क्रमांक १ व ३** :- सदरचा मुद्दा हा प्रशासकीय दृष्टीकोनातून स्विकार्य नाही.<br>पोलीस खात्यातील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या संख्येच्या वर्गीकरणासाठी महिला पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या नावापुढे महिला अशी नोंद घेण्या प्रशासकीय दृष्टया आवश्यक आहे. बऱ्याचदा, काही नावे पुरुष व स्त्रियांमध्ये असल्यामुळे अशा अधिकाऱ्यांची संख्या मोजताना संभ्रम होऊ शकतो.<br>**कार्यासन क्रमांक ४** :- मधून सहायक पोलीस निरीक्षक पदाच्या आस्थापनेचे कामकाज चालते. पोलीस खात्यातील महिला पोलीस अधिकाऱ्यांना गुन्हे तपासणीकरिता देण्याची कार्यवाही संबंधीत पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक करतात. सहायक पोलीस निरीक्षकांच्या पुढे जरी त्या महिला असल्या तरी, महिला सहायक पोलीस निरीक्षक असे नमूद केले जात नाही.<br>**सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा**. | सदर मुद्याच्या अनुषंगाने सर्व महिला पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांची सहमती असेल तर पदनामाच्या पुढे महिला न लिहीता फक्त पदनाम लिहीता येईल. तथापि, बऱ्याच महिला पोलीस अधिकारी बदलीसाठी अर्ज करतात. त्यामुळे सदरचा मुद्दा स्विकारार्ह नाही. श्रीमती निलीमा आराज यांनी त्यांच्या यापूर्वीच्या नेमणूकीच्या तपशीलासह पोलीस महासंचालक यांची भेट घेऊन चर्चा करावी. त्यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना) यांनी महिला पोलीस कर्मचाऱ्यांचे बदलीसाठी प्राप्त झालेले अर्ज सादर करावेत. असे मा. अध्यक्षांनी निर्देश दिले.<br>**चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे**. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| २ | **मुद्दा क्र. ०२**<br>**श्री. नरसिंग शेरखाने,**<br>अपर पोलीस अधीक्षक,<br>नागपूर जिल्हा (ग्रामीण),<br>नागपूर<br>**कार्यासन क्रमांक ३ ते ६** | पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे अवेळी बदल्या केल्या जातात जसे दरवर्षी मे महिन्यात सर्वसाधारण बदली होणे अपेक्षित आहे / आवश्यक असताना अधिकारी यांच्याबदल्या उशिरा केल्या जातात. त्यामुळे नवीन ठिकाणी रुजू होऊन तेथील घटकांअतर्गत नेमणुक होईपर्यंत शैक्षणीक वर्ष सुरु होऊन शैक्षणीक प्रवेशासाठी खुप ताण सहन करावा लागतो. त्यासाठी राज्य / जिल्हा / घटकाअंतर्गत बदल्या वेळेवर झाल्यास पोलीसांवरील ताण कमी होईल. | **कार्यासन क्र. ३** :- पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्या प्रत्येक वर्षी मे महिन्यातच करण्यात येतात. केवळ अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत व असल्यासच, इतर वेळी, नियमांच्या अधिन राहून बदल्या करण्यात येतात.<br>**कार्यासन क्र. ४** :- सहायक पोलीस निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्या ३१ मे पुर्वीच नेहमी केल्या जातात.<br>**कार्यासन क्र. ५-अ** :- सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश मधील विहीत तरतुदीनुसार ज्या पोलीस उप निरीक्षक (राखीव संवर्ग) यांचा बदली अधिनियमानुसार कालावधी पूर्ण झाल्यानंतर बदली करण्यात येते. अशा पोलीस अधिकाऱ्यांचे सेवातपशिल व पसंतीच्या ठिकाणासह तसेच त्यांच्या विनंतीनुसार प्रस्ताव प्राप्त तयार करुन घेऊन सदर बदलीबाबतचे प्रस्ताव पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांचेसमोर सादर करण्यात येतात. त्यास अनुसरुन पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी घेतलेल्या अंतिम निर्णयानुसार पोलीस उप निरीक्षक (राखीव संवर्ग) यांच्या विहीत मुदतीत बदल्या केल्या जातात.<br>**तरी सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा**. | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे**. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ३ | **मुद्दा क्र. ०३**<br><br>**श्री. नरसिंग शेरखाने,**<br>अपर पोलीस अधीक्षक,<br>नागपूर जिल्हा (ग्रामीण),<br>नागपूर<br>**कार्यासन क्रमांक ३ ते ६** | पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या बदल्या करतांना त्यांचे पाल्याचे शिक्षणाचे हित लक्षात घेण्यात यावे. पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या बदली करताना नेमणूक ठिकाणाचे कालावधीचे निकष विचारात घेतले जाते. परंतू बदली पात्र अधिकारी व कर्मचारी यांचे पाल्य १० व १२ वी किंवा तत्सम महत्वाच्या वर्षी शिकत असल्यास बदली पात्र अधिकारी विनंतीनुसार शक्य असल्यास बदल्या कराव्यात. | **कार्यासन क्र. ३ :-** पोलीस निरीक्षकांच्या बदल्या या पोलीस आस्थापना मंडळ (क्र.२) यांचेकडून करण्यात येतात. पोलीस निरीक्षकांनी त्यांच्या पाल्याच्या शैक्षणिक महत्त्वाच्या वर्षाच्या १० व १२ वी सह इतर अन्य शैक्षणिक बाबींच्या अडचणीसह त्यांचे बदलीचे प्रकरण आस्थापना मंडळापुढे ठेवण्यात येते, व सदर बाबींचा सर्वकष व सखोली विचार होऊनच पोलीस आस्थापना मंडळ (क्र.२) बदल्यांविषयी निर्णय घेते.<br>**कार्यासन क्र. ४ :-** याबाबत पोलीस आस्थापना मंडळ नेहमीच सहानुभुतीपूर्वक विचार करते.<br>**कार्यासन क्र. ५-अ :-** सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश मधील विहीत तरतुदीनुसार ज्या पोलीस उप निरीक्षक (राखीव संवर्ग) यांचा बदली अधिनियमानुसार कालावधी पूर्ण झाल्यानंतर बदली करण्यात येते. अशा पोलीस अधिकाऱ्यांचे सेवातपशिल व पसंतीच्या ठिकाणासह तसेच त्यांच्या विनंतीनुसार प्रस्ताव प्राप्त तयार करुन घेऊन सदर बदलीबाबतचे प्रस्ताव पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांचेसमोर सादर करण्यात येतात. त्यास अनुसरुन पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी घेतलेल्या अंतिम निर्णयानुसार पोलीस उप निरीक्षक (राखीव संवर्ग) यांच्या विहीत मुदतीत बदल्या केल्या जातात.<br>**तरी सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.** | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे**. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ४ | **मुद्दा क्र. ०४**<br><br>**श्री. नरसिंग शेरखाने,**<br>अपर पोलीस अधीक्षक,<br>नागपूर जिल्हा (ग्रामीण),<br>नागपूर<br><br>**कार्यासन क्रमांक २६(ब)** | पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे ज्ञाप क्रमांक पोमसं/२६-ब/पदनिर्मिती/अभियंता/ ३२/२०१६, दि.१९/०५/२०१६ अन्वये प्रत्येक घटक कार्यालयाकरीता पोलीस विभागाच्या इमारतीचे बांधकाम / दुरुस्तीचे कामे चांगल्या रितीने होण्याकरीता पोलीस विभागातील समकक्ष दर्जाची (समान वेतन) असणारी पदे प्रत्यार्पीत करुन सदर पदे निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. उप अभियंत्याचे पद निर्माण करावयाचे झाल्यास पोलीस विभागचे समकक्ष दर्जाची (समान वेतन) असलेले पोलीस उप अधीक्षकाचे एक पद प्रत्यार्पीत करावे लागेल त्यामुळे त्यांचे उप विभागातील पोलीस ठाणे इतर उप विभागात वर्ग करावी लागणार आणि त्यामुळे त्या उप विभागीय पोलीस अधिकारी यांचेवर कामाचा ताण वाढुन कामावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तरी पोलीस उप अधीक्षकांचे एक पद प्रत्यार्पीत न करता प्रस्तावीत उप अभियंताचे पद निर्माण करण्यास वेगळी व्यवस्था करण्यात यावी हि विनंती | **कार्यासन क्र. २६-ब** :- दिनांक १९/०५/२०१६ च्या ज्ञापान्वये एकूण ४३ घटक कार्यालयांकडून निमार्ण करावयाच्या अभियंत्याच्या ९९ पदाकरिता प्रतयार्पित करावयाच्या समकक्ष दर्जाच्या पदांची माहिती मागविण्यात आली आहे. परंतू, अद्याप सर्व घटकांची माहिती या कार्यालयास प्राप्त झालेली नाही. प्राप्त माहिती वरुन कार्यकारी अभियंता, उप अभियंता व कनिष्ठ अभियंता यांची समकक्ष दर्जाची पदे म्हणजेच पोलीस उप महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक / पोलीस उप अधीक्षक यांची पदे आहेत. सदर पदे ही पोलीस घटक कार्यालयांच्या आस्थापनेवरील आवश्यकतेपेक्षा कमी असल्यामुळे समकक्ष दर्जाची पदे प्रत्यार्पित न करता त्यापेक्षा खालच्या दर्जाची पदे प्रत्यार्पित करावी लागणार आहेत. जेणकरुन, निमार्ण करावयाच्या ९९ पदांचा खर्च व प्रत्यार्पित करावयाच्या पदांचा खर्च हा समान राहील. त्याप्रमाणात पोलीस उप निरीक्षक, पोलीस हवालदार, व पोलीस शिपाई पदे प्रत्यार्पित करणेबाबत वरिष्ठ स्थरावर प्रस्ताव विचाराधीन होता. त्यानुसार दि. २७/१०/२०१६ रोजी शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.<br>शासन निर्णय क्रमांक एपीओ-3616/प्र.क्र.88/पोल-3, दि. 9/1/2017 अन्वये पोलीस उप अधीक्षकांची 7 पदे व पोलीस उप निरीक्षकांची 53 पदे हि अनुक्रमे स्थापत्य उप अभियंता - 7 पदे, व स्थापत्य कनिष्ठ अभियंता - 53 पदे या पदांमध्ये रुपांतरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.<br>**तरी सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा**. | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे**. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ५ | **मुद्दा क्र. ०५**<br><br>श्री. नरसिंग शेरखाने,<br>अपर पोलीस अधीक्षक,<br>नागपूर जिल्हा (ग्रामीण),<br>नागपूर<br>**कार्यासन क्रमांक २७(ब)** | १) सरकारी निवासस्थानांची संख्या आवश्यकतेपेक्षा खुप कमी आहे. त्यामुळे अधिकारी व कर्मचारी यांना सरकारी निवासस्थान मिळत नाही. पर्यायी पोलीसांना खाजगी घर भाडयाने घेऊन राहावे लागते. बऱ्याचवेळी तेथील परिस्थीती चांगली नसते त्याचा वाईट परिणाम पोलीसांच्या पाल्यावर होतो.<br>२) नागपूर सारख्या शहरामध्ये घर भाडयाने घ्यायचे असल्यास मिळणाऱ्या घरभाडे भत्तापेक्षा २ ते ३ पट जास्तीचा भाडयाने दयावा लागतो त्यामुळे मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागते.<br>३) पोलीसांना दररोज १२ ते १५ तास काम करावे लागते, त्यामुळे नेमणूक असलेल्या पोलीस ठाणे/शाखेजवळ निवासस्थान मिळाल्यास येण्या जाण्याच्या अतिरिक्त ताण कमी होऊ शकतो. | **कार्यासन क्र. २७(ब)** :- राज्यात पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या मंजूर संख्याबळाच्या ८०% प्रमाणात घरे बांधण्याबाबत शासनाचे धोरण असून, पोलीस गृहनिर्माण कल्याण महामंडळ मर्यादीत, मुंबई यांचेकडून सन २०१६-१७ ते २०१८-१९ या कालावधीकरिता नागपूर शहरात एकूण ६२९ आणि ग्रामीण जिल्हयात एकूण ६३२ शासकीय निवासस्थाने बांधकाम करणेकरिता नियोजन स्तरावर कार्यवाही सुरु आहे. | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ६ | **मुद्दा क्र. ०६**<br><br>**श्री. आर. बी. पुरकर,**<br>पोलीस उप निरीक्षक,<br>बिनातारी संदेश विभाग (अभियांत्रिकी),<br>महाराष्ट्र राज्य, पुणे.<br>**कार्यासन क्रमांक ३०** | बिनतारी संदेश गडचिरोली जिल्हा येथील (१) सपोउनि / रेडीओ यांत्रिकी, (२) पोहवा / विजतंत्री, (३) पोहवा / बिनतारी यंत्रचालक, (४) पोहवा / स्तंभकारागीर, (५) पोशि / कर्मशाळा मदतनीस या पदांना १ जानेवारी, २०१२ पासुन दिडपट वेतनवाढ देण्यात आलेली आहे. परंतू (१) पो.नि., बि.सं. (अभि.), (२) पो.नि., बि.सं.(वाह.), (३) पो.उ.नि., बि.सं.(अभि.), (४) पो.उ.नि.,बि.सं. (वाह.), (५) स.पो.उ.नि. / प्रमख यंत्रचालक, (६) स.पो.उ.नि. / भंडारपाल या पदांना दिडपट वेतनवाढ देण्यात आलेली नाही. करिता दिनांक ०१ जानेवारी, २०१२ पासुन पुर्वलक्षी प्रभावने दिडपट वेतनवाढ मंजूर होऊन मिळणेस विनंती आहे. | शासन निर्णय, गृह विभाग, क्र. एनएएक्स-१११०/प्र.क्र.४९९ /वि.शा-१ ब, दिनांक १८/०२/२०११ (सोबत शासन निर्णयाची छायाकिंत प्रत जोडली आहे) अन्वये घोषित केलेल्या गडचिरोली/गोंदिया या नक्षलग्रस्त जिल्हयामधील अतिसंवेदनशिल विभागातील पोलीस ठाणी / उपठाणी / आऊटपोस्ट व इतर विविध शाखेतील / विभागातील कार्यालयात कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना ते त्या ठिकाणी बजावत असलेल्या त्यांच्या कामाचे स्वरुप अंत्यत जोखमीचे असल्याने, कर्मचारी हे त्याठिकाणी कार्यरत असेपर्यत त्यांना देय वेतनाच्या अतिरिक्त ५०% वेतन मिळत आहे. **सदरच्या शासन निर्णयामध्ये बिनतारी संदेश विभागातील रेडिओ मॅकेनिक, इलेक्ट्रेशियन, वायरलेस ऑपरेटर, वर्कशॉप हॅण्ड (मदतनीस) अशी पदे नमुद केल्यामुळे केवळ त्याच पदांना दिडपट दराने वेतन देण्यात येत होते.** आत्ता शासन निर्णय दिनांक ०१/१०/२०१६ च्या प्रमाणे सर्व बिनतारी संदेश विभागातील अधिकारी कर्मचारी यांना दिडपट दराने वेतन दिले जात असल्याने **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा**. | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे**. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ७ | **मुद्दा क्र. ०७**<br><br>**श्री. आर. बी. पुरकर,**<br>पोलीस उप निरीक्षक,<br>बिनातारी संदेश विभाग (अभियांत्रिकी),<br>महाराष्ट्र राज्य, पुणे.<br>**कार्यासन क्रमांक ३०** | राज्यातील पोलीस अधिकारी यांना वेळोवेळी बंदोबस्ताकरिता बाहेरगावी जावे लागते. सद्या पोलीस अधिकाऱ्यांना एशियाड बसची सुविधा वॉरंन्टवर उपलब्ध आहे. काही ठिकाणी एशियाड बस व्यतिरिक्त शिवनेरी / शितल सारख्या वातानुकूलीत एस्.टी. बसची सुविधा उपलब्ध आहे. राज्यातील पोलीस अधिकाऱ्यांना रेल्वेमध्ये वेतनानुसार वातानुकुलीत डब्यामधुन प्रवास करता येतो त्याच धर्तीवर शिवनेरी / शितल या वातानुकुलीत एस्.टी. बसची सुविधा पोलीस अधिकाऱ्यांना मिळणेस विनंती आहे. | पोलीस नियमावली- भाग-१, नियम क्र.३४२ नुसार पोलीस कर्मचारी व अधिकारी (पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त पदांपर्यत) यांना शासकिय कामकाजानिमित्य करावा लागणाऱ्या प्रवासासाठी म्हणून मोटार वॉरन्ट दिले जाते. तथापी राज्य परिवहन महामंडळातर्फे सध्या काही मर्यादित मार्गावर शिवनेरी/शितल या नावाने वातानुकुलीत बस सेंवा चालू आहेत. सदरच्या बसेस् मधून प्रवासासाठी मोटार वॉरंन्ट स्विकृत्त केले जात नाही. याबाबत बैठकीमध्ये चर्चा / विचारविनियम झाल्यास अंतिम चर्चेनतंर आवश्यक वाटल्यास शिवनेरी/शितल या वातानुकुलीत एस.टी.बसची सुविधा पोलीस अधिकाऱ्यांना प्रदान करण्याबाबत शासनाकडे तसा प्रस्ताव सादर करावा अगर कसे त्याबाबत निर्णय घेण्यात यावा.<br>पोलीस नियमावलीमध्ये विहित केल्याप्रमाणे पोलीस निरीक्षक यांच्या श्रेणीपर्यंतच्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना मोटार वॉरंन्ट वापरण्याची सुविधा पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त आणि त्यावरील दर्जाच्या सर्व पोलीदस अधिकाऱ्यांसाठी लागू केली आहे. सोबत पोलीस नियमावली भाग-१, नियम क्र. ३४२ ची छायांकित प्रत जोडली आहे.<br>याठिकाणी असेही स्पष्ट करण्यात येते की, शासकीय कर्मचाऱ्यांना त्यांच्या पदानुसार / वेतनश्रेणीनुसार कोणता प्रवासाचा दर्जा लागू होतो ही बाब वेळोवेळी शासनाकडून प्रवासभत्त्यांच्या दरात सुधारणा करण्यांत येते त्या शासन निर्णयात स्पष्ट केलेली असते. सध्या दिनांक ०३/०३/२०१० च्या निर्णयाप्रमाणे प्रवासभत्ता दर लागू आहेत. त्यामध्ये विहीत केल्याप्रमाणेच शासकीय कर्मचाऱ्यांचे धारण केलेल्या पदांच्या ग्रेड वेतनानुसार विहीत केलेल्या श्रेणीप्रमाणे प्रवास करणे | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे**. |
| | श्री. एस्. एम्. जाधव,<br>पोलीस हवालदार क्र४९५१<br>वाहतूक नियंत्रण शाखा, पुणे शहर<br>**( सभासद नसलेले अधिकारी / कर्मचारी )** | राज्यातील पोलीस अधिकारी व कर्माचाऱ्यांना तपासकामी किंवा सरकारी कामानिमित्त दुर जावे लागते. त्यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या सर्व प्रकारच्या गाडयांचे एस्.टी. वॉरंन्ट मिळणेबाबत चर्चा होणेस विनंती आहे. | | |

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव</th><th>सभासद असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे.</th><th>कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय</th><th>मा. अध्यक्षांचे अभिप्राय</th></tr>
<tr><td></td><td></td><td></td><td>श्रेणीप्रमाणे प्रवास करणे अनुज्ञेय आहे.<br><table><tr><th>अ. क्र.</th><th>शासकीय कर्मचारी धारण करित असलेल्या पदाचे ग्रेड वेतन</th><th>अनुज्ञेय प्रवासाचा दर्जा / श्रेणी</th></tr><tr><td>१</td><td>रु. ६,६००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG +श्रेणी)</td><td>वातानुकुलित बससहित इतर सर्व प्रकारच्या बसेस</td></tr><tr><td>२</td><td>रु. ४,४००/- व त्याहून अधिक मात्र रु. ६,६००/- पेक्षा कमी</td><td>वातानुकुलित बस खेरिज इतर सर्व प्रकारच्या बसेस</td></tr><tr><td>३</td><td>रु. ४,४००/- पेक्षा कमी</td><td>सर्वसाधारण बस</td></tr></table><br>तरी सदर प्रकरणी चर्चेअंती निर्णय घेण्यात यावा.</td><td></td></tr>
</table>

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ८ | **<u>मुद्दा क्र. ०८</u>**<br><br>**श्री. बी.डी.खांडेकर,**<br>पोलीस हवालदार क्र. ५९० ,<br>रा.रा.पो.बल गट क्र. ९,<br>अमरावती<br>**<u>अ.पो.म.सं.,</u>**<br>**<u>राज्य राखीव पोलीस बल</u>** | राज्य राखीव पोलीस बलातील कर्मचाऱ्यांना गडचिरोली, गोंदीया अशा नक्षलग्रस्त जिल्हयात ५ महिने कालावधीचा बंदोबस्त पुर्ण करावा लागतो त्याचप्रमाणे गटात परत आल्यानंतर राज्यातील कायदा व सुव्यवस्था, निवडणूक तसेच बाहेर राज्यातील बंदोबस्त यासाठी साधारणत: वर्षातून ८-९ महिन्याकरिता कर्मचारी हा कुटुंबापासून दूर राहतो. त्यामुळे तो कौटुंबिक अडीअडचणीकडे लक्ष पुरवु शकत नाही पर्यायाने नेहमीच मानसीक ताणतणावामध्ये वावरत असतो अशातच राज्य राखीव पोलीस दलामार्फत २१ ते ६० दिवसांकरिता विविध प्रशिक्षणे बाहेर ठिकाणी सुरु करण्यात आले आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे मानसिक मनोधैर्य ढासळत आहे.<br>करिता विनंती आहे की, आंतरराष्ट्रीय किंवा महत्वाचे (उदा. नप्रपोशि मुलभुत प्रशिक्षण, बॉम्ब डिस्पर्सल, बॅण्ड, बिगुलर, आयुधिक शस्त्र प्रशिक्षण व मो.प.वि.चालक प्रशिक्षण) अशा प्रकारचे प्रशिक्षणे बाहेर ठिकाणी घेण्यात यावे व उर्वरित नव्याने सुरु करण्यात आलेले सर्व प्रशिक्षणे हे गटमुख्यालय स्तरावर घेण्यात यावे. जेणेकरुन प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थी यांचेवर होणारा प्रवास भत्त्याचा अपव्यय टाळता येईल. त्याचप्रमाणे प्रशिक्षणार्थी गटमुख्यालयात प्रशिक्षण करुन त्यांचे मुलांचे शैक्षणिक स्वरुपाच्या व इतर महत्वाच्या | अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल यांनी राज्य राखीव पोलीस बलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाकरिता पाठविण्याबाबत परिपत्रक क्र. २०/२०१६, दि. ३०/०४/२०१६ अन्वये सर्वसाधारण धोरण ठरविले आहे.<br>अ)१) पोलीस कर्मचारी यांची प्रशिक्षणासाठी निवड करताना त्या कर्मचारी याने यापूर्वी सदरचे प्रशिक्षण पुर्ण केले आहे किंवा नाही याची खात्री करावी व कोणत्याही प्रकारे दुसऱ्या वेळेस त्याच प्रशिक्षणासाठी दोन वर्षाच्या आत पोलीस कर्मचारी यांना पाठवू नये.<br>२) पोलीस कर्मचारी यांनी प्रशिक्षणासाठी निवड करताना प्रशिक्षणाचे स्वरुप, पोलीस कर्मचाऱ्यांचे वय, वैद्यकिय क्षमता याचा प्राधान्याने विचार करावा.<br>३) एखादा पोलीस अधिकारी / कर्मचारी ५ महिन्याचा नक्षल बंदोबस्त करुन आल्यास त्याला तात्काळ प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येऊ नये.<br>४) दोन प्रशिक्षणामध्ये कमीत कमी तीन महिन्यांचा कालावधी असावा.<br>ब) सध्या राज्य राखीव पोलीस बलाच्या एकूण १०१ कार्यकारी कंपन्या असून त्यापैकी रोस्टर नुसार एकावेळी १५ कंपन्या गडचिरोली व गोंदीया जिल्ह्यात नक्षल बंदोबस्ताकरिता तैनात आहेत. यानुसार एका कंपनीचा ५ महिन्याचा नक्षल बंदोबस्त कालावधी पुर्ण गट मुख्यालयात परत आलेनंतर सर्वसाधारणपणे त्यांचा २ वर्ष ३ महिन्यांनी (२७ ते २८ महिन्यांनंतर) पुन्हा नक्षल बंदोबस्ताकरिता सदर कंपनीला रोस्टर नुसार पुन्हा नक्षल बंदोबस्ताकरिता पाठविण्यात येते. | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे**. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ८ | **मुद्दा क्र. ०८**<br><br>**श्री. बी.डी.खांडेकर,**<br>पोलीस हवालदार क्र. ५९० ,<br>रा.रा.पो.बल गट क्र. ९,<br>अमरावती<br>**अ.पो.म.सं.,**<br>**राज्य राखीव पोलीस बल** | कौटुंबिक अडीअडचणीकडे विशेष लक्ष पुरवुन मानसिक ताणतणाव कमी होईल. त्याचप्रमाणे गटात चालणाऱ्या प्रशिक्षणात एकसुत्रीपणा येण्याकरिता वरिष्ठ कार्यालयाकडून संबधित प्रशिक्षणाबाबत पाठक्रम ठरवुन पुरविण्यात यावा जेणे करुन सर्व गटात चालणारे प्रशिक्षण हे एकसारख्या स्वरुपात असेल. | ३) यापुर्वी वरिल प्रशिक्षण सत्रांमधील क्र.७ मधील प्रशिक्षण हे वेगवेगळया गटांमध्ये चालविण्यात येत होते, त्यामूळे प्रशिक्षणार्थी कर्मचारी यांना गटमुख्यालयाबाहेर रहावे लागत होते, त्यामध्ये बदल करण्यात येऊन सदरची सर्व प्रशिक्षण सत्रे एकत्रित करुन सध्या राज्य राखीव पोलीस बल गट मुख्यालयामध्येच आयोजित करण्यात आलेली आहेत. तसेच प्रवासभत्त्याचा अपव्यय टाळण्यात आलेला आहे. तसेच पोलीस कर्मचारी यांना आपले कर्तव्य, प्रशिक्षण सांभाळून कौटुंबिक अडीअडचणीकडे लक्ष पुरविता येऊ शकेल असे धोरण राबविण्यात येत आहे. | |

# ४८ व्या राज्य पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीसाठी सभासद नसलेले अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे.

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद नसलेले अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | **मुद्दा क्र. ०९**<br>श्री. ए. एम्. कांबळे ,<br>पोलीस निरीक्षक,<br>राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र, नानवीज.<br>**कार्यासन क्रमांक २ ते ५** | सहायक समादेशक, पोलीस निरीक्षक आणि पोलीस उप निरीक्षक या पदाचे पदोन्नती वर्षातून दोनदा करण्यांत यावे. यामुळे जागा रिक्त राहणार नाही. वेळोवेळी पदोन्नती भराल्याने पदोन्नतीपासून वंचीत राहवे लागत नाही. | **कार्यासन क्रमांक ३ :-** नि:शस्त्र सहायक पोलीस निरीक्षक ते नि:शस्त्र पोलीस निरीक्षक पदी पदोन्नतीचे कामकाज या कार्यासनातून हाताळण्यात येते. शासन नियमांनुसार प्रतिवर्षी सप्टेंबर ते त्या पुढील वर्षातील ऑगस्ट अखेरपर्यंत संभाव्य रिक्त होणाऱ्या पदांसाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेण्यात येऊन ती पेद भरण्याविषयीची कार्यवाही नियमित पार पाडण्यात येते.<br>**कार्यासन क्रमांक ४ :-** शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी २००१/१८८७/प्र.क्र.६४/०१/१६, दिनांक २६/१०/२००४ मध्ये विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार पदोन्नतीकरिता निवडसूची ही प्रत्येक सेवाभराती वर्षामध्ये (१ सप्टेंबर ते ३१ ऑगस्ट) तयार करण्यात येते. म्हणजे ३१ ऑगस्टपर्यंतची संभाव्य रिक्त पदे विचारात घेऊन निवडसूची तयार केली जाते आणि निवडसूची निवड झालेल्या उमेदवारांमधून ज्येष्ठते / प्रवर्गानुसार त्या पदोन्नतीवर्षात रिक्त होणारी पदे भरली जातात.<br>राज्य राखीव पोलीस बल गटांमध्ये सहायक पोलीस निरीक्षकांची मंजूर पदे नसल्याने या मुद्दयाबाबतची माहिती निरंक आहे<br>**कार्यासन क्रमांक ५ :-** पोलीस उप निरीक्षकांच्या सर्वसाधारण बदल्या ३१ मे पुर्वीच नेहमी केल्या जातात.<br>**कार्यासन क्रमांक ५-अ :-** अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, हे राज्य राखीव पोलीस बलाचे विभाग प्रमुख असुन सहायक पोलीस उप निरीक्षक / पोलीस हवालदार यांना सशस्त्र पोलीस उप निरीक्षक (राज्य राखीव पोलीस बल) पदी रिक्त पदानुसार पदोन्नती देण्याची कार्यवाही करतात. | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद नसलेले अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| २ | **मुद्दा क्र. १०**<br><br>श्री. ए. एम्. कांबळे ,<br>पोलीस निरीक्षक,<br>राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र, नानवीज.<br>**कार्यासन क्रमांक २ ते ५** | राज्य राखीव पोलीस बल गटामध्ये रिक्त असणारे पोलीस उप निरीक्षक, पोलीस निरीक्षक, सहायक समादेशकचे पद वेळीच भरले जात नाही. त्यामुळे बलाचे कामकाज व शिस्तीमध्ये परिणाम तर होतोच, शिवाय पदोन्नतीचे टप्प्यात असणारे अधिकाऱ्यांना ज्येष्ठता असून देखील वाट पाहावी लागते. तसेच काही वेळा पदोन्नतीस पात्र असून देखील वंचीत रहावे लागते. त्यामुळे नैराश्य निमार्ण होते. तरी पोलीस उप निरीक्षक, पोलीस निरीक्षक, सहायक समादेशक पदाचे पदोन्नती वेळोवेळी भरण्यांत यावे. | **कार्यासन क्रमांक ५ :-** राज्य राखीव पोलीस बल गटांमध्ये नि:शस्त्र व श्वान अध्यापक पोलीस उप निरीक्षकांची पदे मंजूर नसल्याने या मुद्याबाबतची माहिती निरंक आहे.<br>**कार्यासन क्रमांक ५-अ :-** अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल हे राज्य राखीव पोलीस बलाचे विभाग प्रमुख असुन सहायक पोलीस उप निरीक्षक / पोलीस हवालदार यांना सशस्त्र पोलीस उप निरीक्षक (राज्य राखीव पोलीस बल) पदी रिक्त पदानुसार पदोन्नती देण्याची कार्यवाही करतात.<br>सदरची रिक्त पदे भरण्याकरिता या कार्यासनातून (५-अ) पाठपूरावा करण्यात येतो. | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे**. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद नसलेले अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ३ | **मुद्दा क्र. ११**<br><br>श्री. एस्. एम्. जाधव,<br>पोलीस हवालदार क्र४९५१<br>वाहतूक नियंत्रण शाखा, पुणे शहर<br>**कार्यासन क्रमांक ५** | शासन निर्णय गृह विभाग क्र. आरटीआर ०३०७ / प्रक्र-७२५/पोल ५अ, दिनांक ३१/०४/२००९ मधील तरतुदी व अटीनुसार २५% पदासाठी पोलीस हवालदार, सहायक पोलीस उप निरीक्षक यांची निशःस्त्र पोलीस उपनिरीक्षक पदाच्या पदोन्नतीसाठी परिक्षा सन २०१३ मध्ये झाली होती. सदर परिक्षेमध्ये बिंदू नामावली प्रमाणे पदे भरण्यात येईल अशी अट घालण्यात आली होती. परिक्षेच्या वेळी काढण्यात आलेल्या परिपत्रकाविरुध्द कोणीही कर्मचारी कोर्टात दाद मागण्यासाठी गेले नव्हते. परिक्षा झालेनंतर काही रिक्त पदे भरल्यानंतर काही कर्मचारी न्यायालयामध्ये गेले. त्यामुळे सध्या महाराष्ट्र राज्यामध्ये सदरची पदे मोठया प्रमाणावर रिक्त असताना सुध्दा पदे भण्यात आलेली नाहीत. साधारण १५ ते २० वर्ष दरवर्षी परिक्षा न झाल्याने वरिल परिपत्रकाप्रमाणे भरपुर पदे रिक्त असताना कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ मिळालेला नाही. तसेच कोर्टाचा निकालही लवकर लागत नसल्याने कर्मचारी सेवानिवृत्त झाला तरीही त्याचा त्याला फायदा मिळत नाही. तरी सध्या सन २०१३ मध्ये पास झालेल्या कर्मचाऱ्यांना न्यायालयाच्या अंतिम आदेशाला अधिन राहून सध्या रिक्त असलेली पदे भरण्यात यावी. अथवा सदरची विभागीय परिक्षा लवकरात लवकर घेणेबाबत चर्चा करण्यात यावी. | **कार्यासन क्रमांक ५ :-** न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१२/०१/२०१५ रोजी Status-Quo (जैसे थे) चे अंतरिम आदेश दिलेले आहेत, तसेच त्यानंतर दि. ०५/०२/२०१५ च्या अंतरिम आदेशानुसार नियमित पदोन्नतीच्या आदेशासुध्दा स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे अंतिम आदेशाच्या अधिन राहून सध्या रिक्त असलेली पदे भरणे संयुक्तिक होणार नाही. | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे**. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद नसलेले अधिकारी / कर्मचारी यांनी उपस्थित केलेले मुद्दे. | कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| ४ | **मुद्दा क्र. १२**<br><br>श्री. एल्. एस्. उत्तेकर,<br>उप प्राचार्य (प्रशासन),<br>राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र, नानवीज.<br>**कार्यासन क्रमांक ८** | कार्यालयात काम करणारे कनिष्ठ श्रेणी लिपीक यांचे निवड करीता किमान शिक्षण अट १० वी पास असल्याने, आजचे कामाचे स्वरुप पाहता १० वी शिक्षण हे कमी वाटते. त्यामुळे लिपीक कामामध्ये म्हणवे तसे प्रगती / कामाचे निपटारा होत नाही. त्याकरिता कनिष्ठ श्रेणी लिपीक यांचे निवड करिता शिक्षणाची अट किमान पदवीधर असावेत. | **कार्यासन क्रमांक ८ :-** नमुद मुद्दयाच्या आनुषंगाने कळविण्यात येते की, लिपीक टंकलेखक या पदावर नियुक्तीकरिता ठेवण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हतेमध्ये वाढ करुन, १२ वी परिक्षा (H.S.C.) उत्तीर्ण असण्याबाबतची अट शैक्षणिक अर्हतेमध्ये अंतर्भुत करणेसाठी या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/८/६८०/रा.सु.आ. व पो.त.प्रा. पदनिर्मीती/२१७/२०१४, दिनांक १२/०१/२०१६ अन्वये शासनास शिफारस करण्यात आली असून, बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील लिपीक-टंकलेखक (गट - क) (सेवाप्रवेश) नियमात उक्त प्रमाणे सुधारणा करुन, तशी अधिसुचना निर्गमित करणेबाबत शासनास प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रकरणी शासन आदेश अद्याप प्रलंबित आहेत.<br>**कार्यासन क्रमांक ८ :-** जिल्हयामधील पोलीस अधीक्षक कार्यालय / प्राचार्य पोलीस प्रशिक्षण कार्यालयामध्ये लिपीक-टंकलेखक या पदावर नियुक्तीकरिता मुंबई पोलीस नियमावली (भाग-१) नियम क्रमांक ६१ मध्ये शैक्षणिक पात्रता ही एस्.एस्.सी. उत्तीर्ण अशी आहे.<br>बृहन्मुंबई पोलीस कार्यालयातील लिपीक - टंकलेखक या पदावरील नियुक्तीकरिता शैक्षणीक अर्हता एस्.एस्.सी. उत्तीर्ण ऐवजी १२ वी परिक्षा (एच.एस्.सी.) उत्तीर्ण असण्याबाबतची अट सेवाप्रवेश नियमात अंतर्भुत करणेसाठी या कार्यालयाचे पत्र क्रमांक पोमसं/८/६८०/रा.सु.आ. व पो.त.प्रा.पदनिर्मीती/२१७/२०१४, दिनांक १२/०१/२०१६ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणी शासन आदेश प्रलंबित आहेत. | **शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत मा. अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत.** |

# ४८ व्या राज्य पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीसाठी सभासद असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे.

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे आदेश |
|---|---|---|---|
| १ | **मुद्दा क्र. १** | शासन निर्णय, गृह विभाग, दि.२१/४/२००९ मध्ये नमूद केले आहे की, ६०% मार्कच्या पुढे मार्क असतील, तर नंतर परिक्षा देण्याची गरज नाही. तीन विषयामध्ये ६०% पेक्षा जास्त मार्क असतील तर त्यांना कायमचे पात्र करावे. | सदर प्रकरणी परिक्षेमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना एखाद्या विषयांत ६०% अथवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त झाले असतील तर त्या उमेदवारास त्या विषयामध्ये पुढील परिक्षेकरिता सूट देण्यात येईल. हा नियम वगळणे आवश्यक असल्याबाबतचा प्रस्ताव अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे दि.१२/७/२०१३ चे पत्र, व स्मरणपत्र, दि.२४/३/२०१७ अन्वये शासनास पाठविण्यात आला असून, शासन आदेश अद्याप निर्गमीत केले नाहीत. शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत मा. अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत. |
| २ | **मुद्दा क्र. २**<br>**श्री. अविनाश भगवान हराळ, पोलीस उप निरीक्षक, साठा बांधणी विभाग, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई** | महाराष्ट्र पोलीस दलासाठी सध्या १४,१८२ वाहने उपलब्ध आहेत. सदर वाहनाच्या दुरुस्तीकरीता मॅकेनिकल वर्क, तंत्रज्ञ, व मदतनीस यांची एकूण १,०९० पदे मंजूर आहेत. त्यापैकी ७०४ पदे हजर असून ३८६ पदे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांपैकी १६३ पदांची पदोन्नती परीक्षा घेण्यात यावी. त्याचप्रमाणे उर्वरित २२३ पोलीस शिपाई व तांत्रिक पदांची सरळ सेवेत भरती घेण्यात यावी. | सदर प्रकरणी अध्यक्षांनी सांगितले की, आधुनिकीकरणांतर्गत चांगल्या प्रकारची नवीन वाहने आल्यामुळे दुरुस्तीचे प्रमाण कमी झालेले आहे. त्यामुळे पदे वाढविण्याची गरज नाही.<br><br>**सदरचा मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात येत आहे.** |
| ३ | **मुद्दा क्र. ३**<br>**श्री. अविनाश भगवान हराळ, पोलीस उप निरीक्षक, साठा बांधणी विभाग, मोटार परिवहन विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई** | मोटार परिवहन विभागातील अत्याधुनिकीकरण अंतर्गत अनेक अत्याधुनिक वाहने प्राप्त झालेली आहेत. तर त्याकरीता हजर असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना उत्पादक कंपनीकडून प्रशिक्षण देण्यात यावे. | कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा दर्जा वाढविणे त्यांना IIT प्रशिक्षण किंवा ज्या कंपनीकडून वाहने घेतो त्यांचेकडून प्रशिक्षण देणे, व त्यांचे कौशल्य वाढविणे. दर ६ महिन्यांनी कॅम्प लावून सर्व गाड्या तेथेच कंपनीकडून दुरुस्त करुन घेण्याकरिता लागेल ती मदत करणे. इत्यादी कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करुन सदरचा मुद्दा मान्य असल्याबाबत अध्यक्षांनी सांगितले. |
| ४ | **मुद्दा क्र. ४**<br>**श्री. मंगेश अशोक महाडीक, पोलीस नाईक/४५१ सातारा** | सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र पोलीस कुंटूब आरोग्य योजना चालू करण्याबाबत | **चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.**<br>तसेच त्यांच्या ४० मुद्दे हे पोलीस कर्मचारी वृंद परिषदेचे नाहीत. तरी सदर मुद्द्यांबाबत त्यांनी त्यांचे घटक प्रमुखांना सादर करुन जे मुद्दे पोलीस कर्मचारी वृंद परिषदेमध्ये घ्यायचे आहेत, तेच मुद्दे घटक प्रमुखांमार्फत पाठविण्याबाबत निर्देश दिले आहेत. |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| ५ | मुद्दा क्र. ५<br>**श्री. राहूल धर्मराज खाडे, उप विभागीय पोलीस अधिकारी, मनमाड विभाग, नाशिक ग्रामीण.** | Reward Policy संदर्भात ज्या पोलीस शिपाई/पोलीस निरीक्षक पर्यंत जे रिवॉर्ड देतात त्यामध्ये बदल करावा की, जे मुख्यालयामध्ये विशेषत: ग्रामीण लेवलला बऱ्यापैकी जवळच्या कर्मचाऱ्यांना रिवॉर्ड मिळतात त्यांची नोंद होत नाही. तरी, ज्या फंडातून रिवॉर्ड दिले जातात, त्यामधून रु.१००/-, व रु.२००/- पर्यंत रिवॉर्ड देण्याचे अधिकार अपर पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उप अधीक्षक यांना देण्यात यावेत. जे अधिकारी/कर्मचारी लांबच्या ठिकाणी नेमणूकीस आहेत. त्यांचे रिवॉर्ड मुख्यालयाच्या ठिकाणी पोहचत नाहीत, किंवा पोहचले तरी मंजूर होत नाही. | सदर प्रकरणी जरी पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना रिवॉर्ड दिले गेले तरी, त्याची सेवापुस्तकात नोंद घेण्याकरिता मुख्यालयामध्येच पाठविण्यात येतात.<br>पोलीस अधीक्षकांनीच बक्षीस इत्यादी मंजूर करणे आवश्यक असल्याचे मत अध्यक्षांनी व्यक्त केले.<br><br>**चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ६ | मुद्दा क्र. ६<br>**श्री. धनजंय महादेव येरुळे, पोलीस निरीक्षक, औरंगाबाद शहर** | औरंगाबाद महानगर पालिका आणि पोलीस आयुक्तालयाची हद्द वेगवेगळी आहे. औरंगाबाद पोलीस आयुक्तालयामध्ये १२ पोलीस ठाणे येतात. ८ महानगर पालिकेच्या हद्दीमध्ये आहेत, आणि ३ पोलीस ठाणे बाहेरच्या साईडला आहेत. तर बाहेरच्या पोलीस ठाण्यांच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना २००५ प्रमाणे जो २०% घरभाडे भत्ता आणि पूरक भत्ता दिला गेला पाहिजे तो आकारला जात नाही. १०% आकारला जातो. त्यामुळे ५०% नुकसान होतो. त्यामुळे बाहेर जाण्याकरिता अधिकारी/कर्मचारी इच्छुक होत नाहीत. सदर प्रकरणी पोलीस आयुक्त, औरंगाबाद कार्यालयाने वरिष्ठ कार्यालयाकडे पत्रव्यवहार केला असून, सदर प्रकरणी विचार होणे जरुरीचे आहे. | सदर प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही पोलीस आयुक्त, औरंगाबाद शहर यांचे स्तरावर करण्याचे निर्देश दिले आहेत.<br><br>**चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे**. |
| ७ | मुद्दा क्र. ७<br>**श्री. प्रमोद प्रल्हाद काळे, पोलीस निरीक्षक, अकोला** | अकोला पोलीसांसाठी जी जागा आहे त्या जागेवर पेट्रोल पंम्पसाठी मागणी केली आहे. ती जागा जर पोलीस कल्याण निधीचा पेट्रोल पंम्प सुरु झाला तर त्यातून पोलीस कल्याण निधीचे उत्पन्न सुरु होईल. दरवर्षी वर्गणीतून रु.८,६२,०००/- एवढी रक्कम जमा होते. त्यामुळे पुस्तक अनुदान व इतर अनुदानाकरिता अनुदानाचा पुरवठा करण्याकरिता अडचणी निर्माण होतात. | सदरची जागा ही पोलीस हौसिंगची आहे. याबाबत पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे पत्रव्यवहार केला असून त्यांचेकडून अद्यापपर्यंत या कार्यालयाकडे कळविले नाही. पत्रव्यवहार केल्यानंतर सदर प्रकरणी विचार करण्यात येईल.<br>**सदरचा मुद्दा पोलीस कल्याण निधीशी संबंधीत आहे.**<br>**चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| ८ | **मुद्दा क्र. ८**<br>**श्री. विवेक वसंतराव मुगळीकर, पोलीस निरीक्षक, पिंपरी पोलीस ठाणे, पुणे शहर** | सन २०१३-१४ ला पोलीस मेडलच्या नियमामध्ये बदल झाले आहेत. त्यामध्ये ज्याला ५ very good out standing ACR आहेत, ते पात्र होतात. मागच्या १० वर्षापूर्वी शेवटच्या ५ पैकी ३ out standing असतील त्यामध्ये Norms होते. परंतु हा मुद्दा आला त्यानंतर बरेचेसे पोलीस अधिकारी/कर्मचारी यासाठी पात्र आहेत. आणि त्यामध्ये अजून एक मुद्दा जोड करण्यात आला की, ज्येष्ठतेला जास्त महत्व द्यावे, त्यामुळे सेवानिवृत्ती जवळ आलेल्या पोलीस अधिकारी/ कर्मचाऱ्यांना पदके दिली जात आहेत. त्यामुळे पात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांवर अन्याय होत आहे. पोलीस पदकानंतर राष्ट्रपती पोलीस पदक मिळण्यास ६ वर्षाचे अंतर असावे, अशी तरतूद आहे. तरी सेवानिवृत्ताचा निकष लावल्यास राष्ट्रपती पोलीस पदक मिळणारच नाही. तरी, मेडलसाठी सर्वंकष विचार व्हावा. | मेडलसाठी शिफारस करताना मागील नेमणुका लक्षात घेतल्या जातात, बऱ्याच पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती पोलीस पदक मिळालेली आहेत. शासनाच्या निकषानुसार सेवानिवृत्तीचे वय लक्षात घेतले जाते. सेवानिवृत्तीजवळ आलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्राधान्य देणे हे भारत सरकारचे धोरण आहे.<br><br>**चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| ९ | **मुद्दा क्र. ९**<br>**श्री. सुबराव शंकर लाड पोलीस उप निरीक्षक, वाहतुक विभाग, पुणे शहर** | बऱ्याच पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना अत्युकृष्ट सेवेबाबत राष्ट्रपतीचे पोलीस पदक ज्या दिवशी मंजूर केले जातात त्यावेळेस प्रदान करावे. कारण त्याचे फायदे व ओळखपत्र ६ ते ७ वर्षानंतर दिले जातात. परंतु त्याचे ओळखपत्र व फायदे काहीही मिळत नाहीत. तरी अधिकारी / कर्मचाऱ्यांना पोलीस पदक प्रदान केले पासून त्यांना त्याचे ओळखपत्र व फायदे मिळणेस विनंती आहे. | ज्येष्ठ नागरिक म्हणून एस्.टी. व रेल्वे मध्ये सवलत मिळते, त्यामुळे वेगळ्या आयकार्डची आवश्यकता नाही.<br><br>**चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| १० | **मुद्दा क्र. १०**<br>**पोहवा/३०८७ श्रीमती आशा खंडू पाटील, ठाणे शहर** | महिलाचा गर्भपिशवीचा आजार महाराष्ट्र पोलीस कुंटूंब आरोग्यामध्ये समाविष्ठ करण्यात यावा. कारण गर्भपिशवी आजाराचे वैद्यकीय देयक पाठविल्यास ते देयक नामंजूर होता. तसेच, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये एकच गोडबोले हॉस्पीटल असून महाराष्ट्र पोलीस कुंटूंब आरोग्य योजनेमध्ये आणखी बीटणी हॉस्पीटलचा समावेश करण्यात यावा. | सदरबाबतचा अहवाल शासनास पाठविण्यात आलेला आहे. परंतु शासन त्यावर निर्णय घेत नाही.<br>पोलीस कुंटूंब आरोग्य योजनेमध्ये बीटणी हॉस्पीटलचा समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांना पाठविण्याबाबत मा. अध्यक्षांनी निर्देश दिले आहेत.<br>**चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |

| अ. क्र. | मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव | सभासद असलेले अधिकारी / कर्मचारी यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे. | मा. अध्यक्षांचे अभिप्राय |
|---|---|---|---|
| ११ | **मुद्दा क्र. ११**<br>**पोहवा/३०८७ श्रीमती आशा खंडू पाटील, ठाणे शहर** | जे पोलीस अधिकारी / कर्मचारी ज्या दिवशी सेवानिवृत्त होतात. त्यांना सेवानिवृत्तीच्या दिवशी जीपीएफ व ग्रॅच्युएटीची रक्कम मिळण्याबाबत. | सदर प्रकरणी पोलीस महासंचालक कार्यालयाकडून बरेच परिपत्रक काढण्यात आलेले असून, घटक कार्यालयांकडून कार्यक्रम आयोजित करुन धनादेश देण्यात येतात.<br>**चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |
| १२ | **मुद्दा क्र. १२** | टायर टयुब बॅटरी यांच्यावरती वाहनांवरती होणारा वार्षिक खर्चाच्या मर्यादेमध्ये समावेश होऊ नये त्यामुळे इतर दुरुस्ती कामे वित्तीय मर्यादेमध्ये करणे शक्य होईल. | अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडून मोटार परिवहन व बिनतारी संदेश विभागांतील कामकाजाबाबज/ अडचणीबाबतची कार्यवाही करणे आवश्यक आहे.<br>**चर्चेअंती सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला आहे.** |